# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 25 अंक 8 नोव्हेंबर 2014

## ह्या अंकात


2 दंड

2 नियोजन-आयोग: शरण की मरण? *नंदा खरे*

7 महागाईची 'सुनामी' व नियंत्रण *रमाकांत पितळे*

9 कमळाची पानं *संजीवनी कुळकर्णी*

11 सृष्टिक्रम : थोडा अधिक तपशील *दिवाकर मोहनी*

15 अनश्व रथ, पुष्पक विमान आणि आपण सर्व (लेखांक तीन) *रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ*

21 एक प्राचीन स्थलांतर *सुकल्प कारंजेकर*

24 मराठी भाषेचे भवितव्य *अशोक केळकर*

*25 पत्रसंवाद - १ अरुण फाळके*

26 पत्रसंवाद - २ *सुभाष आठले*



संस्थापक - संपादक
**दि. य. देशपांडे**
(1918-2006)

कार्यकारी संपादक
**अनुराधा मोहनी**

संपर्कः

**अनुराधा मोहनी** anumohoni@gmail.com 9881442448

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

## दंड

हे माझ्या देशा,
ह्या कठीण संकटकाळी जर माझ्या तोंडात फोड आले आणि
मी काही बोलू शकले नाही तर मला दंड दे
माझ्या मुकेपणाचा धिक्कार कर भर चौकात
हे माझ्या माती,
माझ्या फुफ्फुसात भरलेल्या हवे
आणि माझे सिंचन करणाऱ्या जला,
ह्या कठीण काळात माझ्या कंठाच्या तटस्थतेवर थुंका,
हे माझ्या मुक्त आकाशा,
हे माझ्या विनम्र झाडांनो आणि धडधडून पेटलेल्या अग्निशिखांनो,
माझ्या जिभेवर झालेल्या फोडांसाठी मला दंड द्या
फाशीहून कमी तर नक्कीच नाही.
ह्या बनेल मौनासाठी माझ्या प्रेतालाही दंड द्या
आपल्या आठवणीत रात्रंदिवस चाबकाचे फटकारे मारा – आयुष्यभर

*(– बाबुशा कोहली ह्यांच्या मूळ हिंदी कवितेवरून अनुवादित)*

■■

## नियोजन–आयोग: शरण की मरण?

*नंदा खरे*

*गेल्या त्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नियोजन–आयोग (Planning Commission) रद्द करण्याची घोषणा केली. आजपर्यंत हा आयोग पंचवार्षिक व इतर अल्पकालीन योजना रचत असे. पंतप्रधान ह्या आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असत आणि एखादा ख्यातनाम अर्थशास्त्री पूर्णवेळचा उपाध्यक्ष म्हणून काम पाहत असे.*

*मोदींच्या भाषणानंतर अर्थातच माध्यमांमधून बरेच (आणि उथळ) मतप्रदर्शन झाले. पंचवार्षिक योजनांना आज सुरुवातीला (१९५०–८० हा काळ) होते ते महत्त्व आज नाही. त्या योजना आज नेहरूप्रणीत समाजवादाचे भग्नावशेषच मानल्या जातात. आज नियोजनाद्वारे शासन जे करू पाहत होते ते बाजारपेठ आपोआप करते, असे मानले जाते.*

*आजवर सरकारी खर्चात दोन प्रकारची विभागणी केली जात असे. दीर्घायुषी संपदा उभारणारा भांडवली खर्च, आणि तात्पुरत्या गरजा पुरवणारा महसुली खर्च, ही एक विभागणी, सोबतच अर्थव्यवस्थेला दिशा देणारे नियोजित खर्च आणि परिस्थितिजन्य योजनाबाह्य खर्च, असे ही विभाजन केले जात असे. आज शासनाने अर्थव्यवस्थेला दिशा देणे गैर मानले जात असल्याने दुसरे विभाजन असंबद्ध ठरवले जात आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारात पंतप्रधानांच्या विश्वासातला माँटेकसिंग अहलुवालिया नियोजन आयोगाचा कार्यकारी प्रमुख होता. म्हणजे*

*त्या सरकारचा काही प्रमाणात तरी दिग्दर्शन हवे होते. आज ते अनावश्यक वाटत आहे. त्यामुळे नियोजन आयोग अनावश्यक ठरतो.*

*केंद्र सरकारचा नमुना वापरत नाही राज्यांत ही राज्य नियोजन आयोग असत. आता तेही निरर्थक ठरले आहेत.*

*हे सगळे कितपत खरे, कितपत इष्ट, खापर दिलीप नाचणे या अर्थशास्त्रज्ञाने 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली' या दर्जेदार नियतकालितकात एक लेख लिहिला. तो या विषयात रस असलेल्या लोकांना समजावून देण्यासाठी भारतीयअर्थविज्ञानवर्धिनी या पुण्यातील संस्थेने नाचण्यांना भाषण देण्यास पाचारण केले. विषय होता 'नियोजन–आयोगाची बरखास्ती अपरिहार्य आहे का?' भाषण आयसीसी टॉवर्स, सेनापती बापट रोड, पुणे येथील सुमंत मुळगावकर सभागृहात दिले गेले. (२० सप्टें. २००४, सायंकाळी ४.००).*

*शंभर माणसे क्षमतेच्या सभागृहात दोनशे श्रोते, ज्यांपैकी सव्वाशे (तरी) पस्तीस वर्षे वा कमी वयाचे, असा हा कार्यक्रम झाला.*

*नाचणे इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रीसर्च, या मुंबईतील संस्थेचे संचालक होते व इतरही अर्थशास्त्रीय व शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाची पदे त्यांनी सांभाळली आहेत. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे माजी संचालक, नीळकंठ रथ, हे अध्यक्ष होते. अभय टिळक यांनी सूत्र संचालन केले.*

*यासभेचा वृत्तांत खाली देत आहोत .*

(नाचण्यांच्या मते) नियोजन–आयोगाच्या बरखास्तीच्या बातमीने कॉर्पोरेट जगतात आनंदोत्सवाचे वातावरण आहे, जे अनाठायी आहे. अनेकांना वाटते की नियोजन–आयोग नेहरूंच्या रशियाधार्जिण्या धोरणांमधून उपजला. तसे ते नाही. स्वातंत्र्य मिळण्याआधीही अनेक भारतीयांना भारताचे नियोजनबद्ध पद्धतीने औद्योगिकीकरण व्हावेसे वाटत होते. दादाभाई नौरोजी, आर.सी.दत्ता, महादेव गोविंद रानडे, अशा अनेकांनी यासाठी प्रयत्न केलेले आहेत. नियोजन आयोग घडण्यामागच्या अनेक प्रभाषांमध्ये हे प्रयत्नही होते. सोव्हियत पंचवर्षीय योजनांसोबत पाश्चात्त्य विकास–अर्थशास्त्रांचाही प्रभाव नियोजन आयोगाच्या रचनेवर आणि कार्यांवर होता. महात्मा गांधी, जे.सी. कुमारप्पा, अशा अनेकांच्या विचारधारांना नियोजनात स्थान होते. (स.गो. बर्वे यांचे 'विथ मॅलिस टूवर्ड्स नन्' हे पुस्तक आयोग घडणीचा इतिहास नोंदते. – नंदा खरे)

सोव्हिएत नियोजन १९२८ च्या सुमारास सुरू झाले. लेनिन, स्टालिन, ट्रॉट्स्की या तिघांच्या दृष्टिकोनात मोठाले फरक होते. स्तालिनने आधी ट्रॉट्स्कोला तीव्र विरोध केला पण नंतर त्याचीच धोरणे 'आपली' म्हणून पुढे केली. हा

प्रकार १९२१ ते २७ होत होता. या काळातील सोव्हिएट अर्थशास्त्रविषयक नियतकालिके आज रशियात उपलब्ध केली जात नाहीत पण ती अमेरिकन संदर्भ–ग्रंथालयात भेटतात. नाचणे रशियात राहिलेले, रशियन भाषा जाणणारे, आहेत. ते हे उपकथानक सांगतात.

एक चर्चा नियोजन पूर्वप्राप्त–गुणदोषांप्रमाणे रचावे की अंतिम हेतूंवर याबाबत होती (Genetic planning or telcological?).

औद्योगिक विकासासाठी असंतुलित विकास करून शेती क्षेत्राचा बळी द्यावा का, हा चर्चांमधील दुसरा कळीचा मुद्दा होता. वेगवेगळ्या क्षेत्रांतील विकासाचे परस्परसंबंध तपासणारी 'मटीरियल बॅलन्सेस,' तत्त्वेही चर्चेत होती.

या सोव्हिएट चर्चांना समांतर चर्चा पाश्चात्त्य विकासाचे अर्थशास्त्र रचणाऱ्यांमध्येही झडत होत्या. या अर्थशास्त्रातून उमजलेल्या कळीच्या संकल्पना अश्या :

प्रत्येक अर्थव्यवस्थेच्या विकासात एक 'टेक ऑफ' स्थिती येणे गरजेचे असते. एकदा ही स्थिती आली की मग विकास स्वयंप्रेरित, स्वयंचलित होतो. ही स्थिती येईपर्यंत तरी सरकारने अर्थव्यवस्थेला चालना देणे, देत राहणे, गरजेचे असते.

शेतीक्षेत्र काही प्रमाणात तोट्याचे करावे, म्हणजे त्या क्षेत्रातील मनुष्यबळ उद्योगक्षेत्राला उपलब्ध होईल.

अर्थव्यवस्था मिश्र असावी, म्हणजे तिचे नियंत्रण अंशत: सरकारी व अंशत: निव्वळ बाजारपेठी असावे.

(एकूण पाहता नेमके काय करावे, याबाबत सोव्हिएत आणि पाश्चात्त्य अर्थशास्त्रे समांतरच उत्तरे देतात. या संदर्भात जॉन केनेथ गॅलब्रेथची एक कादंबरी आठवते, 'द ट्रायम्फ', जिच्यात एक दक्षिण अमेरिकन देश आपण हार्वर्ड विद्यापीठाने सुचवलेली पंचवार्षिक योजना राबवतो आहोत असे सांगत अमेरिकन मदत घेतो, आणि सोव्हिएत नमुना वापर राहतो – नंदा खरे)

या परकीय प्रभावांसोबतच भारतीय प्रभावही होते. म. गांधींच्या तंत्रज्ञान–विरोधातही छटा असत. ग्रामीण अर्थव्यवस्थेत दखल न देणारे तंत्रज्ञान ते सुसह्य मानत असत. वेगवान औद्योगिकरणाचे दुष्परिणाम खेडेगावांना भोगावे लागू नयेत, यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोग घडवून खेड्यांना थोडेफार संरक्षण दिले गेले. लघु–उद्योगही असेच काहीसे संरक्षित ठेवले गेले. अनुसूचित जातीजमातींचे आरक्षणही खास भारतीय समाजासाठी घडलेले होते. पुढे 'गरिबी हटाव' धोरणे, सहकारी चळवळीला मदत, राम मनोहर लोहियांच्या सूचनांचा आदर, सर्वोदयवाद्यांना अवकाश देणे, इत्यादी बाबीही नियोजनाचा भाग बनल्या. नाचण्यांच्या मते नेहरू व प्रोशांतोचंद्र महालनोबिस यांनी असे विविध प्रभाव सामावून घेण्याची तारेवरची कसरत सर्वसंमतीने आणि सक्षमपणे करून दाखवली.

१९९१ साली भारताने आर्थिक उदारीकरणाचा (भाषांतर : बाजारपेठेला जास्त मुक्त करण्याचा) स्वीकार केला. या धोरण–बदलाआधी नियोजन–आयोग काय काय करत असे याचा तपशील नाचण्यांनी मांडला.

एक म्हणजे विकासाबाबतचे दूरदृष्टीचे धोरण घडवत, बदलत सरकारच्या मनातले भविष्याचे चित्र रेखले, आज ज्याला 'व्हिजन डॉक्युमेंट' म्हणतात. (आणि पूर्वी ज्याला 'पर्स्पेक्टिव्ह' म्हणत), ते घडवणे हे नियोजन आयोगाचे महत्त्वाचे काम असे.

ज्याचा सोव्हिएत अर्थशास्त्री 'मटीरियल बॅलन्सेस' म्हणत त्यालाच पाश्चात्त्य अर्थशास्त्री 'इनपुट आऊटपुट ॲनॅलिसिस' म्हणत. वेगवेगळ्या क्षेत्रांतील उत्पादनांचा एकमेकांवर काय परिणाम होतो, याचा हा अंकबद्ध अभ्यास असतो. हे मोठेच सांख्यिकीय विश्लेषणही नियोजन आयोगाने अंगावर घेऊन पूर्ण केले.

वेगवेगळी राज्ये, वेगवेगळी मंत्रालये, यांच्यात उपलब्ध संसाधनांचे वाटप कसे करावे, हे नियोजनआयोग सुचवत असे. या सूचनांमध्ये फेरबदल करून मंत्रिमंडळ अंतिम निर्णय घेत असे. (माधव गोडबोले यांनी आयोग–बरखास्तीच्या संदर्भात म्हटले की ते समांतर सरकार झाले होते. बहुधा आयोगाच्या सूचना व मंत्रालयांच्या सूचना यांच्या 'पंजा लढणाऱ्यात हे मत घडले असावे. – नंदा खरे.)

एखाद्या मंत्रालयाला, राज्याला, धोरणे ठरवताना सल्ला लागला तर ते मंत्रालयाची किंवा राज्य नियोजन आयोगाची मदत मागू शकत असे. प्रत्यक्ष सरकार पातळीच्यापेक्षा जरा अनौपचारिक, असे हे सल्लागारपद असे.

खाजगी उद्योजक आणि गुंतवणूकदारांनाही नियोजन आयोगाचा उपयोग होता, हे नाचण्यांनी ठसवले. कोणते क्षेत्र जोमाने विकसित होणार, कोणते सुस्त पणाने, याबाबत सूचना नियोजन–आयोगाच्या अहवालांतून मिळत असे. हे 'गाईडपोस्ट्स' खाजगी क्षेत्राने गांभीर्याने घेतले मात्र नाहीत, हेही नाचणे नोंदून गेले

या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यात आयोग कितपत यशस्वी झाला? विकासाचा वेग फार काही वाढवता आला नाही. गरिबी फार हटली नाही. आर्थिक विषमता फारशी घटली नाही. आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी झाली नाही. देशाचे सोने गहाण टाकण्याची गरज पडावी, इतकी ही तूट वारंवार वाढत राहिली.

पण अन्नाबाबत भारत बराचसा आत्मनिर्भर झाला. निर्यातीसाठी उत्पादनांची अनेक क्षेत्रे सक्षम झाली. अनेक देशांशी भारत व्यापार करू लागला. सुरक्षेला आवश्यक अशी अनेक उत्पादने भारतात घडू लागली. जमिनीचा वापर, कौशल्यांचा विकास, याबाबतीमध्ये ही भारताने बरीच प्रगती साधली आणि हे सर्व सेक्युलर लोकशाही व्यवस्थेच्या कक्षेमध्येच साध्य करता आले. या साऱ्या यशापयशाचे श्रेयही नियोजन आयोग अंशत: तरी घेऊ शकते.

उदारीकरणानंतर मात्र नियोजन आयोग खच्ची केला गेला. दूरदृष्टीने भविष्याची व्यवहारी 'स्वप्ने' नोंदण्याचे काम नियोजन आयोग करेनासा झाला. विविध क्षेत्रांना एकमेकांशी जुळते करणारे इनपुट–आऊटपुट विश्लेषण होईनासे झाले. बाजारव्यवस्थेवरचा विश्वास इतका वाढला की नियोजनाने निवृत्ती स्वीकारली!

यावर अर्थशास्त्रज्ञांचा प्रतिक्रिया कशा होत्या?

एक दृष्टिकोन प्रोणोब सेन यांनी मांडला की, आयोगाने पुन्हा एकदा १९५० च्या मनोभूमिकेत जाऊन आपल्या कार्यकक्षा नव्याने ठरवाव्या.

दुसरे मत होते की नियोजन आयोगाला तिलांजली द्यावी.

नाचणे दुसऱ्या मतप्रवाहातले आहेत, की नियोजन आयोगाने बाजारपेठची अर्थव्यवस्थेशी जुळवून घ्यावे. म्हणजे नेमके काय करावे, हेही नाचण्यांनी स्पष्ट केले.

***

बाजाराची स्पर्धात्मकता कायम राखावी, ज्यामुळे नव्या तंत्रज्ञानाला चालना मिळत राहील.

याचाच भाग म्हणून स्पर्धात्मकता कमी करणाऱ्या, एकाधिकार वाढवणाऱ्या रचनांना कमी करणाऱ्या, आयोगाने करावे (Contestability)

बाजारपेठी व्यवस्थेत सर्वांना सरकारने पुरवलेल्या सेवा व वस्तूंचे महत्त्व वाढत जाते. त्यामुळे अशा सेवा व वस्तूंवर कोणी किती हक्क सांगायचा, याचे वितरण नियोजन आयोगानेच ठरवावे. ते बाजारपेठेवर सोडणे अनिष्ट ठरेल.

गरिबी हटवणे, विषमतेवर अंकुश ठेवणे, विशिष्ट समाजघटकांना 'सांभाळून' घेणे, ही कामे नियोजन आयोगच करू शकतो. बाजारपेठ या बाबतींमध्ये अमानुष तटस्थ असते.

आंतरराज्यीय प्रश्न आयोगाने सोडवावे. वेगवेगळ्या राज्यांमधले राष्ट्रीय वीज जाळ्यामधून (national power-grid) वितरण, नदी–जोड घडल्यास पाणी–वापराबाबतचे आंतरराज्यीय वादही आयोगाने सोडवावे. वेगवेगळ्या मंत्रालयांमधील वादही नियोजन आयोगाने सोडवावे.

***

हे कसे करता येईल? नियोजन आयोगाला पर्यायी यंत्रणा आहेत का?

एक नमुना फ्रान्सने पुरवला आहे. त्यात नियोजन यंत्रणा वारंवार मोठ्या उद्योगांशी, उदयोगक्षेत्रांशी चर्चा करते, आणि यातून देशाला काय हवे आहे याचे प्रारूप मांडते. याला दिग्दर्शक (indicative) किंवा वारंवार चर्चात्मक (iterative) नियोजन म्हणतात. नाचण्यांनी हेही नोंदले की मुक्त बाजारपेठी नमुना जसजसा जास्त प्रबळ होत गेला, तसतसे फ्रेंच उद्योग या प्रक्रियेबाबत उदासीन होत गेले.

असे असूनही आज विकसित, देशांमधील सरकारी खर्च, सरकारनियंत्रित अर्थव्यवस्था, ह्या एकूण अर्थव्यवस्थेच्या अर्ध्यापेक्षा जास्त भाग व्यापतात. भारतात हे प्रमाणे जेमतेम २८% आहे. म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेत सरकारी हस्तक्षेप सुमारे दुप्पट व्हायला हवा आहे

***

दुसरा पर्याय आहे अत्यंत हुषार तज्ज्ञ वापरून उभारलेल्या 'थिंक टँक्स'चा या यंत्रणेत मुठभर तज्ञ सरकारने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देतात, आणि थेट सल्ले देण्याऐवजी विचारलेले प्रश्न हेच 'खरे' प्रश्न आहेत, असे मानतात

नाचण्यांच्या मते नियोजन आयोग हा एक थिंक टँक आहे असे मानणे हे पराभूत मनोवृत्ती दर्शवते. जर आयोगाऐवजी थोडेसेच तज्ञ वापरायचे ठरले तर हे तज्ञ सहज खरेदीकेले जाऊ शकतात. एखादा मोठा उद्योजक थिंक टँकचे अहवाल आपल्या सोईनुसार 'घडवून' घेऊ शकतो.

दुसऱ्या बाजूला थिंक टँक वापरणारे सरकार आपल्याला हवे ते तज्ञ निवडून विशिष्ट प्रकारचे अर्थशास्त्र केंद्रस्थानी आणून ठेऊ शकतो.

सल्लागार संस्था व्यापक, सर्वसमावेशक, तटस्थ करूनच हे दोष लक्षात येतील. नाचण्यांच्या मते आजचा नियोजन आयोग अशा तटस्थ नमुन्याच्या जवळ आहे. त्याला लहान करणे घातक ठरू शकते.

***

आपल्या अध्यक्षीय भाषणात नीळकंठ रथांनी आजच्या वास्तवाचे त्यांना दिसणारे चित्र रेखाटले. त्यांना आजचे सरकार सर्वसमावेशकतेपासून झपाट्याने दूर जाताना दिसते. एका टप्प्यावर ते म्हणाले, 'हे सरकार आपले खास शहाणपण वापरून (खप ऴीी ुऴीवो) भारतीय रिझर्व्ह बँकही बरखास्त करेल'

***

एकूण पाहता आज स्वातंत्र्य हे मूल्य समतेचा संकोच करताना दिसते. आज कागदोपत्री तरी भारतात पाकिस्तानापेक्षा कमी क्षमता आहे, तर चीनपेक्षा जास्त. आपण कोणते मूल्य अग्रक्रमाने स्वीकारावे हे आपणच ठरवायचे आहे.

जर आमचे मत असे असेल की चीनइतकी विषमता होऊ दे, पण त्यांच्याइतकी सुबत्ता कमावू या, तर नियोजन आयोग बरखास्त होऊ दे. जर आपण सुबत्तेपेक्षा समता वरची मानत असलो, आणिकही पुढे जाऊन मानवी विकास निर्देशांक (र्कीरप उर्श्रींशश्रोशिपीं खपवशु) सुधारू इच्छित असलो, तर नियोजन आयोग आणखी सबळ करावा.

...... निर्णय आपल्या मूल्यव्यवस्थेनुसार ठरेल.

*१९३, मश्रूवाला मार्ग, शिवाजीनगर,*
*नागपूर ४४० ०१०*

■■

## अट्टहास आणि हव्यास

सर्व काही 'मराठीपणा' परदेशी आणायचाच असा अट्टहास जसा व्यर्थ आहे तसाच परदेशी चौकटीत ठीकठाक बसण्यासाठी आपलं मराठीपण विसरण्याचा प्रयत्नही अर्थशून्य आहे. देशी राहताना आपला देव, धर्म, समाज, वेष, भाषा, परंपरा, सण, खाद्यपदार्थ अशा सर्व पाळामुळांचा कळत–नकळत विसर पडू लागण्याची शक्यता असते. आपली संस्कृती जाणीवपूर्वक जिवंत ठेवली गेली नाही तर एक धोका म्हणजे पुढच्या पिढीची वाढ एका निर्विकार (न्यूट्रल) वातावरणात होऊ लागते. त्यांना स्वत:ची अशी काही संस्कृती उरत नाही. ना धड भारतीय, ना मराठी, ना पाश्चिमात्य अशी त्रिशंकू अवस्था होते. अनेक वर्षात प्रत्यक्ष भारतभेट न घडल्यामुळे मुलांनी भारत कसा आहे हेही पाहिलेलं नसतं. मराठी जाऊ द्या, पण भारत देशच त्यांच्या दृष्टीनं 'परदेश' झालेला असतो.

*प्रियदर्शन मनोहर – याच नावाच्या निबंधामधून*

■■

# महागाईची 'सुनामी' व नियंत्रण

*रमाकांत पितळे* (माजी आर्थिक सल्लागार, भारत सरकार)

भारतात २००९ पासून किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या किंमतवाढ उपभोक्ता-किंमत-निर्देशंकाने (Consumer Price Index - CPI) मोजली जाते. हा निर्देशांक श्रम मंत्रालयातील लेबर ब्यूरो, सिमला येथे तयार केला जातो.

सध्याच्या निर्देशांक २००१ हे वर्ष १०० धरून किंमतीबद्दल मोजला जातो. ७८ औद्योगिक केंद्रांकरिता निर्देशांक तयार केला जातो व याची सरासरी म्हणजे देशातील किंमत-वाढीचा निर्देशांक. २००१ च्या निर्देशांकाच्या किंमती ३७० वस्तु व सेवांकरिता २८९ बाजारांतून गोळा केल्या जातात. ही किंमतीची माहिती राज्य सरकारचे कर्मचारी गोळा करतात. त्याकरिता त्यांना मानधन दिले जाते. वस्तूच्या किमती किरकोळ बाजारामधून (Retail Market) गोळा केल्या जातात.

## महागाईचा 'सुनामी'

देशात २००९ पासून सर्वच वस्तूंच्या किमती भरमसाठ वाढल्या. त्यावर कोणतेही नियंत्रण नव्हते. सरकार किंमत-नियंत्रण करू शकले नाही. सर्वच थरांतील लोकांचे वास्तविक उत्पन्न (Real Income) झपाट्याने कमी होत गेले. मजूर भिकारी झाले तर मध्यम वर्गीयांची अवस्था मजुरासारखी झाली. उपभोक्ता निर्देशांक (१००१=१००) २००६ पासून प्रकाशित होण्यास सुरुवात झाली. २००६ चा सरासरी किंमत निर्देशांक प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली. २००६ चा सरासरी किंमत निर्देशांक जो १२३ होता तो २०१३ ला २३२ होता. म्हणजे ७ वर्षांत किमती ८८% वाढल्या. याचा अर्थ २००६च्या १०० रुपयाची किंमत फक्त १२ रु. राहिली. २०१० पासून तर किंमतवाढ दर वर्षी जवळ जवळ १०% होती. सर्वसामान्य जनतेच्या उपभोगाच्या अन्नाच्या व भाजीपाल्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाली. मे २०१० ते मे २०१३ दरम्यान अन्नकिंमतनिर्देशांक ५४% वाढला तर भाजीपाल्याच्या किंमती ५६% वाढल्या. लोकांची क्रयशक्ति झपाट्याने कमी होत गेली. विशेष म्हणजे अन्नधान्याचे किंवा भाजीपाल्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे किमती वाढल्या नाहीत तर उत्पादन व साठा भरपूर असूनही ह्या किमती वाढल्या व वाढत आहेत. अन्नधान्याचे उत्पादन २०१३-१४ मध्ये २६३ दशलक्ष टन आहे व अन्नधान्याचा साठा ६३ दशलक्ष टन आहे. एकूण पुरवठा ३२६ दशलक्ष टन आहे. मग किंमत वाढ प्रचंड प्रमाणात का झाली व होत आहे? याचा अर्थ अन्नधान्य व इतर वस्तूंचे व्यवस्थापन व्यवस्थित केले नाही व सरकारचे किरकोळ बाजारावर (Retail Trade) मुळीच नियंत्रण राहिले नाही. किंमतवाढीच्या व्यतिरिक्त किंमत तेवढीच ठेवून कमी वजनाच्या वस्तूंची विक्री करण्यात येत आहे. उदा. चहाची किंमत तीच दाखवली असली तरी वजन ५०० ग्रॅम वरून ४५० ग्रॅ. केले. तसेच इतर वस्तूंचे तेव्हा त्याच किमतीला कमी वजनाच्या वस्तू हे एक नवीन महागाईचे स्वरूप पाहावयास मिळते. ह्यावर काहीहि नियंत्रण नाही व ग्राहकांच्या नजरेलासुद्धा ते येत नाही.

## महागाईची सुनामी का?

उपभोक्ता वस्तूच्या किमतीत प्रचंड वाढ २००६ पासून सुरू झाली. सार्वजनिक वितरणप्रणालीतून अन्नधान्याचा पुरवठा योग्य प्रकारे चालू होतो. कृषि-उत्पन्न-बाजार समिती व्यतिरिक्त अन्नधान्य विकत घेण्याची परवानगी खाजगी कंपन्यांना देण्यात आली. सरकार किमतींच्या नियंत्रणाकरिता १८ ते २० दशलक्ष टन अन्नधान्याची खरेदी साठवण करीत होती. २००५-०६ मध्ये फक्त ११ दशलक्ष टन खरेदी केली. त्यामुळे नवीन पीक येण्याच्या दरम्यान सार्वजनिक प्रणालीतला पुरवठा कमी झाला. याचा फायदा खाजगी व्यापाऱ्यांनी घेतला व गव्हाची किंमत रु ८/९ प्रति किलोहून रु. १८/२० झाली. तसेच इतर वस्तूंच्या बाबतीत झाले. गहू आयात करूनही किंमतींवर नियंत्रण येऊ शकले नाही. किमती वाढतच राहिल्या.

तसेच शेतकऱ्यांच्या अन्नधान्याच्या किमती वाढवून देण्याचे सरकारने ठरविले. किमान समर्थन मूल्य (Minimum Support Price) आता जवळ जवळ दुप्पट झाले आहे. त्यामुळे मूळ किमतीतच वाढ केल्यामुळे बाजारातील व

सार्वजनिक वितरण प्रणालीत किमती वाढत गेल्याक्र किमान समर्थन किंमतीतील वाढीचा फायदा हरियाणा व पंजाबच्या शेतकऱ्यांना मुख्यत: झाला. कारण एकूण गव्हाच्या उत्पादनापैकी ७५% उत्पादन हरियाणा व पंजाबमध्ये होते. तसेच तांदुळाचे ४५ ते ५०% उत्पादन याच दोन राज्यात होते. सार्वजनिक वितरणप्रणालीतील भ्रष्टाचारामुळे गरीब जनतेपर्यंत पोहचत नव्हती. भाववाढ होत राहिली.

या शिवाय कृषिमंत्र्यांच्या वक्तव्यामुळे पण वस्तूंच्या किमती वाढल्या. साखरेची, दुधाची किंमत वाढणार आहे असे म्हटल्यामुळे त्याच्या किंमती वाढल्या. २००९ मध्ये साखरेची किंमत रु. १८ प्रति किलो होती. ती रु ४० झाली. दूध २१ रुपयांवरून ४४ रुपये प्रति लिटर झाले. तांदूळ रु ३० हून रु ६० प्रति किलोवर गेला.

या व्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या (पेट्रोल डिझेल) किमती वाढत गेल्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढला. ज्यावर सरकारचे काही नियंत्रण नसते. हवामानाच्या प्रतिकूल बदलामुळे या काळात भाजीपाल्याच्या व फळांच्या किमतीत पण मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. सरकारचे खाजगी बाजारावर व साठेबाजीवर नियंत्रण न राहिल्यामुळे किमतीत ‘सुनामी’ वाढ झाली.

### मोदीसरकार : किंमतवाढीवर नियंत्रण

उपभोक्ता–किंमत–निर्देशांक ५ गटांमध्ये विभागलेला असतो. हे गट आहेत: अन्न (Food), तेल, गॅस, दिवाबत्ती (Fuel and Light) व कापड (Clothing). घरभाडे (Housing rent) व इतर वस्तू. या ५ गटांपैकी अन्न, तेल/गॅस ह्या दोन गटांतील वस्तूंच्या किंमत–वाढीचा उपभोक्त्याच्या बजेटवर प्रत्यक्ष परिणाम होतो. कापड वगैरे अनेक चैनीच्या वस्तूंचा उपभोग किंमती वाढल्या तर पुढे ढकलता येतो.

मोदीसरकारला किंमतींच्या नियंत्रणाकरिता या दोन गटांच्या वाढत्या किमतीकडे लक्ष द्यावे लागेल. याला प्राथमिकता द्यावी लागेल. गहू, तांदूळ, डाळी, खाण्याचे तेल, भाजीपाला या दैनंदिन उपभोगाच्या वस्तूंच्या किमतीवर निगराणी ठेवून मागणीप्रमाणे पुरवठा करावा लागेल. गहू व तांदूळ ह्यांचे उत्पादन व साठा भरपूर आहे. तो गरीब जनता व सामान्य लोक ह्यांपर्यंत पोहचला पाहिजे. भारतीय खाद्य निगमचे पण गहू, तांदूळ व इतर वस्तूंची किरकोळ विक्री खाजगी दुकानांतून तशीच ती डिपार्टमेंटल स्टोअर्स, बचत गट, गैरसरकारी संस्था मार्फत सुरू केली पाहिजे. किफायत दराने ही विक्री केल्यास किंमती नियंत्रणात राहतील व त्या कमी होण्यास मदत होईल. प्लास्टिकच्या पारदर्शक पिशव्यांमध्ये (१, ३ व ५ किलो) हे विकता येईल. अन्नाचा पुरवठा वाढला की बाजारातील किरकोळ किमती कमी होतील. तसेच ७८ शहरांपैकी कोणत्या शहरात किमती झपाट्याने वाढत आहे यावरलक्ष केंद्रित केले पाहिजे. केंद्रीय सांख्यिकी संस्थेच्या अभ्यासाप्रमाणे एकूण किमतवाढीत उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, पश्चिमबंगाल, आंध्र, तामीलनाडू, गुजरात, राजस्थान व कर्नाटक या आठ राज्यांचा वाटा ६४% आहे. तेव्हा या आठ राज्यातील किंमत, वाढीवर विशेष लक्ष केंद्रित करून मागणीपुरवठ्यात ताळमेळ बसवला पाहिजे. साठेबाजी करणाऱ्यांवर अनुशासनात्मक कारवाई केली पाहिजे.

तसेच गहू, तांदूळ, कांदा, टमाटर व बटाटे यांच्या किमतींवर विशेष नियंत्रण केले पाहिजे. आठ राज्य व ४ वस्तूंच्या किमती नियंत्रित करून किमती कमी केल्या तर किंमती ३–२% कमी होऊ शकतात.

या व्यतिरिक्त (पेट्रोल व डिजेल) इंधन तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या २/३ महिन्यांपासून किमती कमी झाल्यामुळे त्यांच्या वाढीवर नियंत्रण ठेवता येईल. किमती कमी करता येतील. तसेच इंधन तेलाच्या बाबतीत शक्य असेल तर किमती कमी असताना लांब पल्ल्याचे करार (Agreement) करावे. साठा करावा म्हणजे किंमत आन्तरराष्ट्रीय बाजारात वाढली तरी त्याचा परिणाम आन्तरिक किमतीवर होणार नाही.

भाजीपाल्याच्या व फळांच्या किमती बाजारात मोसमाप्रमाणे कमी जास्त होत असतात व ती कायमस्वरूपी वाढत नाही. तरी शेतकरी व ग्राहकांचे हित लक्षात घेऊन किंमत नियंत्रण केली पाहिजे.

आपल्या 'किंमत सुनामी'(Inflation) च्या संवादात अमेरिका व पश्चिम युरोपात किमतीचा निर्देशांक २ ते २.५% इतकाच असतो. असे का? अमेरिकेत 'किंमत सुनामी' का नाही? अमेरिका तर पश्चिम देशात किंमत वाढ २ ते २.५% ने होताना दिसते असे का हा प्रश्न पडतो.

अमेरिकेत किंमत वाढ २ ते २.५% असण्याचे मुख्य कारण म्हणजे उपभोक्ता किंमत निर्देशांक तयार करण्याची पद्धत अमेरिकेची श्रमविभाग दोन मुख्य किंमत निर्देशांक तयार करतो. उपभोक्ता किंमत निर्देशांक *Joë`m* व मूळ किंमत निर्देशांक (Core Price Index) पहिल्या निर्देशांकात अन्न व इतर ५ गटांच्या किमतीचा समावेश असतो. तर कोअर किंमत निर्देशांकात अन्न व घरगुती ऊर्जा (तेल, गॅस, वीज) यांच्या किमती वगळून निर्देशांक तयार केला जातो. याचे कारण अन्न व ऊर्जेच्या किमतीत मोठ्या प्रमाणात बदल होत असतात. हे बदल कायम स्वरूपाचे नसतात. दुष्काळ पडला तर अन्नाच्या किंमती भरमसाठ वाढतात पण इतर वेळी त्या तेवढ्या प्रमाणात वाढत नाही. तसेच ऊर्जेबाबतीत. ह्या दोन गटांच्या किंमती वगळल्यामुळे किंमत वाढीचा दर्शविणारा उपभोक्ता किंमत निर्देशांक २ ते २.५% वाढताना दिसतो. हाच कोअर निर्देशांक अमेरिकेत किंमत वाढ मोजण्याकरिता वापरला जातो. आपल्या सारखीच उपभोक्ता किंमत निर्देशात मोठी वाढ असते पण ती वगळल्यामुळे किंमत वाढ कमी दिसते.

अमेरिकेत दरडोई उत्पन्न जास्त आहे त्यामुळे अन्न व ऊर्जेच्या किमती तात्पुरत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या तरी त्याचा उपभोक्ता बजेटवर मोठा परिणाम होत नाही. या उलट आपल्यासारख्या गरीब देशात बहुसंख्य लोकांचे उत्पन्न गरिबी रेषेच्या खाली आहे. त्यामुळे अन्न व ऊर्जेच्या किंमत वाढीचा विपरीत परिणाम जीवनमानावर होतो. त्यामुळे आपल्या निर्देशांकात अन्नाचा व ऊर्जेचा समावेश होणे आवश्यक आहे. किमती कमी झाल्या पाहिजे. निर्देशांक कमी ठेवणे हे उद्दिष्ट असू शकत नाही. किंमत निर्देशांक (core Index) कमी ठेवून त्या आधारे व्याज दर कमी गुंतवणुकीला चालना इत्यादि उद्देश अमेरिकेत अर्थव्यवस्थेत प्रेरित केले जातात.

*प्लॉट नं. २७, फ्रेन्डस् लेआउट – ४,*
*रविन्द्रनगरजवळ, नागपूर – ४४० ०२१*
*भ्रमणध्वनी – ९५०३२८४०१३*

■■

## कमळाची पानं

*संजीवनी कुळकर्णी*

देशमुख आणि कंपनी यांनी जाई निंबकरांचा कमळाची पानं  हा कथासंग्रह नुकताच प्रकाशात आणला आहे. विविध मासिकातून १९७४ ते २००७ या काळात छापल्या गेलेल्या या कथा एकत्रितपणे या पुस्तकातून प्रकाशात आलेल्या आहेत. लेखिकेचा लोटस लीव्ज नावाचा इंग्रजी कथासंग्रह बऱ्याच पूर्वी प्रकाशित झालेला आहे. कमळाची पानं या संग्रहात त्यातल्या काही कथांचे अनुवाद आहेत. अर्थात हे काही कथांखाली अनुवादकाचे नाव आहे, एवढ्यावरून म्हणायचे. एरवी पुस्तकाला कुणाचीही प्रस्तावना नाही, पती, मुले, प्रकाशक वगैरेंचे आभार मानणारे लेखिकेचे मनोगत नाही. अर्पणपत्रिका नाही, कथेतली चमकदार वाक्येही मलपृष्ठावर नाहीत. त्यामुळे प्रत्येक कथा आपापल्या हिंमतीने वाचकांच्या समोर येऊन उभी राहते. 'म्हणजे काय ना' अशी तिची तरफदारी लेखिका किंवा कोणीही करत नाही.

कथा वेगवेगळ्या विषयांच्या, वेगवेगळ्या वातावरणातल्या असल्या तरी सर्वच स्त्रीभावाने लिहिलेल्या आहेत. ही पुस्तकाची जमेची की त्रुटीची बाजू मानावी हे मला एकंदरीने सांगता येणार नाही, पण अनेकदा लेखकांनी स्त्रीभावाने किंवा लेखिकांनी पुरुषभावाने लिहिले की ते कथन बिघडते, असे आपल्याला दिसते. कथांचा एकंदर विषय फसलेले मानवी नातेसंबंध असा म्हटला तर, नेहमीचाच आहे. ही फसगत उमजण्यामधूनच या कथा झालेल्या आहेत. कधी ती

फसगत जाणूनबुजून आहे, तर कधी अगदी अजाणता. कधी अचानक समोर उलगडून आलेली आहे, कधी आपली आपल्यालाच वेगळ्यानं समजलेली आहे तर कधी सर्वनाशाची वेळ येईपर्यंत कुणालाच समजलेली नाही. साहित्य हा काही लिहिणाऱ्याच्या मनाचा आरसा समजायचे कारण नाही, पण एखाद्या लेखकाचे किंवा लेखिकेचे साहित्य निर्माण होते, आणि पोसले जाते ते त्याच्या/तिच्या मनावरच. 'कमळाची पानं' ह्या संग्रहातल्या अनेक कथांमध्ये या फसणाऱ्या नातेसंबंधांकडे उत्कट तरी व्यक्तिस्वातंत्र्याच्या निर्भीड समजेने आणि मनाचा तळ उपसत तरीही तटस्थ वृत्तीने पाहण्याचा या लेखिकेचा स्वभावविशेष आहे तो या संग्रहाचे नाव सार्थ करतो.

हातातले पुस्तक संपेपर्यंत खालीच ठेवले जात नाही, हा आता क्वचितच येणारा अनुभव अनेक वर्षांनी मला या संग्रहाने दिला. पण, कथा-विशेषत: चांगल्या कथा-वाचून खाली ठेवेपर्यंत वाचकाला बांधून घालतात. आपापला विचार करायचे स्वातंत्र्य त्यानंतरच मिळण्याची शक्यता असते. इथे 'कमळाची पानं'या संग्रहाचे वेगळेपण दिसते. यातल्या कथा चांगल्या असूनही आपल्याला बांधून घालत नाहीत. त्या वाचतानाही आपण स्वतंत्रच असतो; ह्याचे कारण ह्या कथांची काहीशी कोरडी म्हणावी इतकी तटस्थ भाषा! स्त्रीभावानं लिहिलेल्या कथा असूनही अक्षरश: एकाही प्रसंगात भावविभोर सुरातली हळवी ओली ओथंबलेली भाषा इथे आपल्याला औषधापुरतीही सापडत नाही. उलट प्रसंगाप्रसंगांमधून सापडलेली जीवनाचे कोडे उलगडणारी अनेक तत्त्वे किंवा तात्पर्ये या कथांमध्ये मधूनमधून स्पष्ट वाक्यांमध्ये येतात. ही वाक्ये नेहमीच्या अर्थाने नव्हेत अशी, पण सुभाषिते म्हणता येतील. अशी अनेक वाक्ये या संग्रहात सापडतात.

उदा.

'मी ज्याला प्रेम म्हणते, ते माझं दुसऱ्याशी असलेलं नातं सांगत नाही. फक्त माझ्या भावनेचं वर्णन करतं. स्वत:भोवतीच मला घोटाळवतं, ज्याच्यावर प्रेम असल्याचा मी दावा करते त्याच्याबाबतीत मग मी जास्त संवेदनाक्षम बनण्याऐवजी कमीच बनते.'

आणि

'कधी फासे उलटे पण पडतात. जो जुगार खेळतो त्याला ही शक्यता धरून चालावंच लागतं.'

किंवा 'एकमेकींच्या अपरिचित आणि अज्ञात आयुष्यात डोकावून पाहणं हा संवादाचा पाया होऊच शकत नाही, किंवा हे बघा.

'माणूस वेगवेगळ्या नात्यात विभागला गेला की त्याच्या निरनिराळ्या गरजा निरनिराळी माणसे पुऱ्या करू शकतात. तो एकाच बिंदूशी एकवटला की त्या बिंदूला लेसर किरणांप्रमाणे जाळून टाकू शकतो,

सामान्यपणे मराठी पुस्तकांना मिळणाऱ्या वाचकवर्गाच्या मनात शब्दरूप मिळालेल्या विचारांची म्हणजेच परा पश्यंतीनंतर येणाऱ्या मध्यमेची जी भाषा असते, तीच ह्या पुस्तकाची साधीसुधी, अनलंकृत भाषा आहे, मात्र ती परखड आहे.कथनाच्या कुठल्याही पायरीवर किंवा परिस्थितीत ती जराही अडखळत नाही. त्यामुळे या कथा कुणाला काही पटवतही नाहीत, कुठलीही कथा जशी आहे तशीच सरळसोट, मात्र समर्पकता कुठेही ढासळू न देता आपल्यासमोर येते.

या कथांमध्ये व्यक्त होत असलेला कालखंड आणि लेखनाचा प्रत्यक्ष काळ यात फरक नाहीय, म्हणजे त्यात प्राचीन, ऐतिहासिक इ. किंवा भविष्यकाळाबद्दलचे कल्पनारंजन नाही. पण लिहून झाल्यावर जवळजवळ तीसपस्तीस वर्षांनी आता आपण त्या वाचत असताना समानता, मानवी हक्क, नातेसंबंध यांबद्दलच्या एकंदर त्या काळातल्या समाजधारणा आणि कथेतल्या व्यक्तिरेखांच्या धारणा यात फरक आहे. खरे तर त्यानंतरच्या पिढीत स्त्रियांमध्ये क्वचितच पण तरीही दिसणारा बेडर स्पष्टवक्तेपणा, परिस्थितीला निर्भयपणे सामोरे जाण्याचा तटस्थ दृष्टिकोण आणि मानवी भावविचारांची निर्भेळ समज ह्या कथांमधून दिसते. त्यामुळे 'कमळाची पानं' मधल्या बऱ्याच कथा पस्तीस ते चाळीस वर्षे आधीच्या असूनही त्या जुन्या किंवा जून झालेल्या वाटत नाहीत. उलट आजच्याही आयुष्याशी यथास्थितपणे मेळ

खातात. संग्रहातही कथांचा क्रम का कुणास ठाऊक पण मासिकांत प्रकाशित झालेल्याच्या काळानुसार ठेवलेला आहे. म्हणजे ७४ सालची कथा पहिली व २००७सालची शेवटची! मला विचाराल तर, या कथांबद्दलचा माझ्या आवडीचा क्रमही काहीसा तोच आहे. मला त्यातल्यात्यात कमी आवडलेली कथा २००७ सालातली आहे.

नातेसंबंध हा मुळातच म्हटले तर प्रत्येकाच्या जीवनातला जिव्हाळ्याचा आणि तरीही अपरिचित किंवा पुन:पुन्हा संशोधन करावा असा प्रांत आहे. जोडीदार, मूल, मित्र, मैत्रिणी, आई, वडील, सहकारी, अशा अनेक जवळिकीच्या किंवा अंतरावरच्या नात्यांत आपण त्याचा शोध घेतच असतो. या नात्यांमधल्या प्रत्येकाच्या बहुपदरी व्यक्तिमत्त्वाचे, आकलनाचे, धारणांचे प्रतिबिंब नात्यांमध्ये पडत असतेच. त्यामुळेच जे घडायचे ते घडते. आपली त्याबद्दलची समज विस्तारायची तर स्वत:पलीकडे जाऊन बघावे हे तसे आपल्याला माहीत असलेलेच तरीही अनेकदा न जमणारे सत्य. या सत्याचाच शोध संग'हातल्या कथा घेतात. तो सरस, सुरस आणि वेधक आहे.

आपल्या जिभेवरचे भाषेचे वळण प्रमाण मानल्या गेलेल्या भाषेच्या जवळचे असणार्यो लेखकांनाही ग्रामीण वळण आसपास ऐकायला मिळालेलेअसतेच. अनेक लेखकांच्या कथाकादंबऱ्यांमधून ते आलेले दिसते. अशा बहुतांश कथा भाषेच्या अंगाने उण्या असतातच, त्यामुळे त्यातून व्यक्त होणारे मानवी मनांचे अंगणही अपुरेच जाणवते. कमळाची पानं मध्ये सुदैवानं अशी एखादीच कथा आहे.

जाई निंबकर या मराठीतल्या भरघोस लिहिणाऱ्या लेखिकांपैकी नाहीत. त्यांचे आजवरचे मराठीतले प्रकाशित साहित्य (मी वाचलेले आहे, असा माझा समज आहे; पण ते) इतके कमी आहे की या लेखिकेच्या मांडणीची चाकोरी आपल्या मनावर आधीपासून उमटलेली असण्याची शक्यताच नाही. इतकेच नाही तर लेखिकेचे छायाचित्र, यापूर्वी प्रकाशित झालेल्या साहित्याची यादी असे काहीही या पुस्तकात छापलेले नाही. त्यामुळे ह्या कथा 'बघा, वाचायचं तर वाचा, नाहीतर राहिलं,' अशा कमळाच्या पानांसारख्या नि:शंक अनाग्रहानं आपल्या समोर उभ्या राहतात. पण, आपल्याला जर वाचण्याची इच्छा असेल, तर मात्र त्या आपल्याशी मनापासून बोलतात, अगदी अटातटीच्या म्हणाव्यात अशा चर्चाही त्यांच्याशी होऊ शकतात. पुस्तक वाचून खाली ठेवले, तरी आपल्या मनातले या कथांसोबतचे संवादाचे नाते संपत नाही.मला या संग्रहाचे हेच यश वाटते.

*अमृता क्लिनिक, संभाजीपूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४,*
ई–मेल ... sanjeevani@prayaspune.org *भ्रमणध्वनी – ९८२२००१४७७*

■■

## सृष्टिक्रम : थोडा अधिक तपशील

*दिवाकर मोहनी*

एखाद्या मानवसमूहाला, एकाच वेळेला, एखादी गोष्ट सुचणे ह्याला मी सृष्टि–क्रम असे नाव दिले आहे. ह्या सृष्टिक्रमाचे वैशिष्ट्य असे की त्याच्या प्रभावाखाली असणाऱ्या बहुतेक सगळ्या व्यक्ती साधारणपणे एकाच प्रकारचे वर्तन करतात. आपल्या इतिहासात आपण डोकावून पाहिल्यास आपल्याला असे आढळते की, साधारण एकाच काळात, ज्यांचा एकमेकांशी संपर्क नाही, त्यांची जैविक उत्क्रांती जरी समान असली तरी, त्यांची 'काल्पनिक' उत्क्रांती भिन्न भिन्न असते. 'काल्पनिक' हा शब्द ह्या ठिकाणी नेहमीपेक्षा वेगळ्या अर्थाने वापरला आहे. त्याचा रूढ अर्थ, ज्याला वास्तवाचा आधार नाही अश्या घटना. अश्या घटनांचे वर्णन हे काल्पनिक असल्याचे म्हटले जाते. मला हा शब्द 'कल्पनाविषयक' ह्या अर्थाने वापरावयाचा आहे. माणसाची कल्पनाशक्ती कुठवर धाव घेते, तिला कुठल्या मर्यादा आहेत ह्यासंबंधीचा विचार मला ह्या 'काल्पनिक' शब्दाने सुचवायचा आहे. मानवशास्त्राप्रमाणे एखाद्या मानवसमूहाचे किंवा जातीचे अध्ययन करताना, त्यांच्याशी निगडित असलेल्या Mythology चे ही अध्ययन करावे लागते. त्या Mythology

च्या अध्ययनातून त्यांचे *काल्पनिक* विश्व प्रकट होते. ह्या चूँहेश्रेसूसोबत ते वापरत असलेली उपकरणे, शस्त्रे व त्यांची भाषा ह्यावरूनसुद्धा त्यांच्या काल्पनिक म्हणजे कल्पनाशक्तिविषयक विश्वाचा परिचय होत असतो. कोठे वस्त्र–विद्या असते कोठे नसते. कोठे भाषा प्रगत असते कोठे नसते.

मानवाची कल्पनाविषयक अवस्था सृष्टिक्रमाने ठरते असे मला प्रतिपादन करायचे आहे. सृष्टिक्रमाने काय काय ठरते वा घडते ते आपण ह्यापुढे पाहू. सृष्टिक्रमाने युग ठरते. पाषाणयुग, ताम्रयुग, लोहयुग इ. हे भौतिक क्षेत्रातले झाले. मानसिक क्षेत्रात 'मनु' ठरतात. एका प्रकारच्या संकल्पनांच्या ऐवजी दुसऱ्या संकल्पना जेव्हा मानवाच्या मनात येतात तेव्हा 'मन्वन्तर' झाले असे म्हणतात. तेव्हा 'मनु' हा शब्द हा मानव, मानस ह्यांशी संबंधित आहे तर 'युग' हा काळाशी.

सद्य:कालीन 'मनु'मध्ये आपल्या मनोविश्वात देव आहे; धर्म आहे आणि त्याचबरोबर भाषाभिमान, राष्ट्राभिमान अश्याही वस्तू आहेत. ह्या वर उल्लेखिलेल्या संकल्पनांचे सद्य:कालीन मानवाच्या मनात वास्तव्य आहे. आपल्या मनात ज्यांचे वास्तव्य आहे, अश्या वस्तूंचा आढावा आपण घेऊ. आपल्या अंधश्रद्धांचाच नव्हे तर आपल्या डोळस श्रद्धासुद्धा आपल्याला येथे विचार करणे गरजेचे आहे. आपण बऱ्याच गोष्टींना पवित्र मानतो त्याचप्रमाणे अपवित्रदेखील मानतो. पण खरे सांगायचे तर पवित्र आणि अपवित्र असे काहीच नसते. ज्या वस्तू एका ठिकाणी पवित्र त्याच दुसऱ्या ठिकाणी अपवित्र ठरू शकतात. एका ठिकाणी उपवासाला चालणारे पदार्थ दुसऱ्या ठिकाणी निषिद्ध असतात. शुभमुहूर्तांच्या बाबतीतही तसेच आहे. दक्षिण भारतात अमावस्येचा दिवस शुभ मानला जातो. (तेथे राहुकालाचे महत्त्व जास्त आहे) उपवास केल्याने आपण देवाच्या नजीक जातो हाही भ्रमच आहे. जुन्या सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना आता मागे पडल्या असल्या तरी शुभाशुभाच्या कल्पना, वास्तुदोष घालवण्यासाठी केले जाणारे उपाय, हे सारे तथ्यहीन आहे. हस्तसामुद्रिक आणि फलज्योतिष ह्यांना कसलाही शास्त्रीय आधार नाही. एखाद्या अपघातामुळे, ढगफुटीमुळे, भूस्खलनामुळे, त्सुनामीमुळे कधी शेकडो तर कधी कधी हजारो लोकांचे प्राण संकटात येतात. ते वेगवेगळ्या 'मुहूर्ता'वर जन्मलेले असतात. मुहूर्त पाहून, पत्रिका जुळवून केलेली लग्नेच यशस्वी होतात व इतर होत नाहीत असा काही अनुभव नाही. आपण त्या अग्निब्राह्मणांच्या साक्षीने केलेला समंत्रक विवाह आपल्याला अत्यंत पवित्र विधी वाटतो. त्यामुळे निर्माण होणारे नवरा–बायकोचे नाते जन्मोजन्मी टिकते असे आपण मानतो पण त्यातही अजिबात तथ्य नाही. ते जन्मोजन्मी टिकते ह्या समजुतीमुळे ब्राह्मणांनी विधवा–विवाहनिषेध आणि घटस्फोटनिषेध प्रचारात आणला. ज्या क्षणी विधवाविवाह आपण मान्य केला त्याक्षणी विवाहाचे पावित्र्य आपण नष्ट केले व त्याला कराराचे स्वरूप दिले असे माझे मत आहे. कारण अशा पुनर्विवाहित पत्नीची निष्ठा पुढच्या जन्मी कोणत्या पतीशी राहणार असा प्रश्न निर्माण होतो. एकपतिकत्व, बहुपतिकत्व ह्याच्या प्रथा स्थलकालसापेक्ष असल्याकारणाने त्या तत्कालीन 'मनु'शी निगडित आहेत असे म्हणणे भाग पडते.

भारतातल्या अनेक जातींतील विवाहविषयक वैविध्य आश्चर्यजनक आहे, ते आता आपण पाहू. राजस्थान आणि मध्यप्रदेशाच्या सीमेवरील एका जातीमध्ये सगळ्या विवाहयोग्य स्त्री–पुरुषांची लग्ने एकाच दिवशी, एकाच मुहूर्तावर होतात. हा मुहूर्त अक्षयतृतीयेचा असतो. ती अक्षयतृतीया दर १२ वर्षांनी येते त्यामुळे एक मुहूर्त टळला तर बारा वर्षेपर्यन्त मुहूर्त नाही आणि लग्नेही नाहीत. परिणाम असा होतो की १२ वर्षाच्या आतल्या मुलांचीच लग्ने होतात. बालविवाहाचा निषेध करणाऱ्या कायद्याचा तेथे अजिबात उपयोग होत नाही. तसे केल्यास म्हणजे कायदा पाळल्यास, त्यांना जात वाळीत टाकते. त्यांच्याबरोबरचा अन्नोदकव्यवहार बंद होतो. आणखी एका जातीत पद्धत अशी आहे की तेथे १५–१६ वर्षाच्या मुलीचे लग्न ४–५ वर्षांच्या मुलाशी करतात व तिला होणारी मुले, नात्याने जो तिचा सासरा असतो त्याच्यापासून होतात. कारण त्यावेळी तो सुनेच्या वयाचा असतो. आणखी एका जातीत एखादी स्त्री विधवा झाली तर तिच्या दिरांपैकी कोणताही एखादा तिला दहाव्या दिवशी चुडेदान करतो आणि तेवढाच विवाहविधी असतो. हा दीर विवाहित असला तर त्याच्या ह्या दोन्ही बायका एकमेकींना समजून आनंदाने राहतात. त्यामुळे बाईला जास्त दिवस वैधव्य सोसावे लागत नाही व मुले बाप नसल्याने पोरकी होत नाहीत. पण हे विचारपूर्वक होत नाही. जातीची

चाल म्हणून होते. मध्यभारतातील काही जातींमध्ये नवऱ्याच्या धाकट्या भावाला त्याची भावजय आपल्या शय्येवर बोलावते व हे सर्वसंमतीने होते. म्हणजे स्त्रियांचे प्रसंगवशा झालेले बहुपतिकत्व त्या त्या समाजाला मान्य होते. रसेल आणि हिरालाल ह्यांच्या पुस्तकात ह्याविषयी अधिक माहिती आढळेल.

ह्या आणि अशासारख्या चाली पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या आहेत व त्यांमुळे समाज नष्ट झालेला नाही. आपला मुद्दा असा की कोणतेही सयुक्तिक कारण नसताना ह्या प्रथा पडतातच कश्या? तर माझ्या मते हा सारा सृष्टिक्रमाचा प्रभाव आहे.

ह्या सृष्टिक्रमामुळे जो धर्माभिमान निर्माण होतो त्याचे फार मोठे दुष्परिणाम झालेले आपल्यास माहीत आहेत. वर सांगितलेल्या विवाहविषयक चालीरीती त्यांच्याबद्दलच्या अभिमानापोटी आजवर टिकल्या आहेत. आणि त्या अभिमानाच्या मागे जसे कुठलेही तर्कशुद्ध कारण नाही तसेच धर्माभिमानाच्या मागे जसे कुठलेही तर्कशुद्ध कारण नाही. ज्या अभिमानाच्या मागे तर्क नाही, पुरावा नाही, त्याला श्रद्धा असे म्हणतात. सगळ्याच प्रकारची श्रद्धा, राष्ट्राभिमान, भाषाभिमान, आपल्या उज्ज्वल संस्कृतीचा अभिमान, आपल्या पवित्र तीर्थक्षेत्रांचा अभिमान, आपल्या थोर पुरुषांच्या मूर्तीविषयींचा पूज्यभाव, आपल्या जातीविषयींचा अभिमान, हे सारे श्रद्धेतून निर्माण होते आणि श्रद्धांना कुठलाही तर्कशुद्ध आधार नाही.

पैसा आपल्या दैनंदिन व्यवहारातील एक अपरिहार्य अंग होऊन बसला आहे. ह्या पैशाला सुद्धा शून्य किंमत आहे. पैसा म्हणून ज्या वस्तूचा सध्या वापर होतो, ती वस्तू म्हणजे कागद. पूर्वी काही धातू (चांदी, तांबे, सोने वगैरे सारखी) वापरली जात पण त्याही आता चलनातून काढून घेतल्या आहेत. जिला काही स्वतोमूल्य आहे अशी कोणतीही वस्तू सध्या पैसा म्हणून वापरण्यात येत नाही. ह्याचा अर्थ असा होतो की आपण सगळे मिळून त्या विशिष्ट पद्धतीने छापलेल्या कागदावर मूल्याचा आरोप करतो. जसा आपण एखाद्या गावावर हे तीर्थक्षेत्र आहे असा आरोप करतो किंवा एखाद्या मूर्तीवर देवत्वाचा आरोप करतो, तसाच हा प्रकार आहे. त्या गावात कुठलेही पावित्र्य नसते आणि त्या दगडधोंड्यात देव नसतो. रत्नांच्या ठिकाणी, सोन्याच्या ठिकाणी असलेले मूल्य माणसाने त्यावर आरोपित केलेले असे आहे. पैशाला आता लेर्ीींशी च्या युगात चलनाचीही गरज राहिलेली नाही. ऊीशवळीं लरीव, ऊ्शलळीं लरीव ह्यांच्या योगे एका खात्यातून दुसऱ्या खात्यात आकडे गेले की पैशाच्या प्रत्यक्ष व्यवहाराची गरज लागत नाही. आणखी एक उदाहरण देतो. काही कोटी रुपये भांडवलाची कंपनी स्थापून एक कारखाना उभारायचा आहे. भांडवल कसे जमा होते? ड्हरीशी विकून ीहरीश विकत घेताना रोख रक्कम दिली जात नाही. उहर्शीीश दिला जातो. कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारात रोकड वापरली जातच नाही. नुसता आकडा इकडून तिकडे जातो. थोडक्यात काय तर, पैसा हा केवळ आकड्यांचा खेळ आहे. पण तुमच्या खात्यावर असलेल्या आकड्यांचा किती मोठा आधार वाटतो! म्हणजे मानवी व्यवहार हा अशा 'मानीव' सत्यावर आधालेला आहे. सगळ्या मानवजातीला एकाच वेळी ह्या मानीव गोष्टी सुचतात म्हणून त्या सत्य ठरतात. अशा मानीव सत्यांना डोळस श्रद्धा म्हटले जाते. परस्परांना ओळखणाऱ्या समाजात त्या सार्वत्रिक आहेत. देव तेवढ्याचमुळे सत्य आहे. पूर्वी भुतेखेते ही सत्य होती कारण सर्वांचा त्यावर विश्वास होता.

सृष्टिक्रमामुळे किंवा तत्कालीन 'मनु'मुळे जे समज किंवा गैरसमज निर्माण होतात, त्यांना हटवणे अशक्यप्राय असते. आपल्या देशात रोज काही कोटी स्त्रिया नवऱ्यांचा मार खातात. त्या मारणाऱ्या नवऱ्यांचे समुपदेशन करून काही उपयोग होत नाही. आणि त्या मार खाणाऱ्या बायका हे विधिलिखित आहे किंवा सटवीने आपल्या नशिबात लिहून ठेवले आहे, असे समजून मुकाट्याने तो मार खातात. हे सारे विधिलिखित नसून हा सृष्टिक्रमाचा भाग आहे आणि ह्याचा कालखंड आपल्याला, त्यासाठी प्रयत्न केल्यास कमी करता येईल. असे मला वाटते. हे प्रयत्न गेल्या शतकात ब्राह्मणांच्या विधवाविवाहाच्या बाबतीत जसे केले गेले तशा प्रकारचे करावे लागतील.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्यांमध्ये मला कोठलाही फरक दिसत नाही. आपल्या काही श्रद्धांना डोळस श्रद्धा म्हणणे ही आत्मवंचना आहे. आपल्या ज्या विश्वासाला कोठलाही तर्कशुद्ध आधार नाही (आधार असलाच तर तो

प्राचीनग्रंथांतील वचनांचा आहे), त्याला उरापोटाशी बाळगून त्याची सत्यासत्यता न तपासता, त्यावर आक्षेप घेणाऱ्यांना 'तुम्ही आमच्या भावना दुखावल्या' असे म्हणून चूप केले जाते. ते सारे विषय मनूच्या प्रभावामुळे म्हणजेच सृष्टिक्रमामुळे आपल्या मनात ठाण मांडून बसलेले असतात.

मग श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्यांत फरक काय? अंधश्रद्धा ही काही थोड्या लोकांच्या मनात असते; ती श्रद्धेइतकी सार्वत्रिक नाही आणि बहुदा हिच्यामुळे दुसऱ्यांना उपद्रव होतो. ह्या ज्या उपद्रव करणाऱ्या श्रद्धा त्यांचा नायनाट, त्यांचे निर्मूलन व्हायलाच पाहिजे ह्यात शंका नाही. पण त्याचबरोबर ज्यांना आपण डोळस श्रद्धा म्हणतो त्या धारण केल्यामुळे समाजाचा कोणता लाभ होतो तेही पहायला पाहिजे. गेल्या महिन्यात पुण्याला दगडूशेठ हलवायाच्या गणपतीसमोर ३५००० महिलांनी एका स्वरात गणपतिअथर्वशीर्षाचा पाठ केला. पण त्यांचा आवाज गणपतीच्या विशाल कानांपर्यंत पोहोचला ह्याचा काही पुरावा मिळत नाही. आणि तो जोपर्यंत मिळत नाही तोपर्यन्त तो पोहोचला नाही असेच मानावे लागेल. ते असो.

ह्या सृष्टिक्रमाचा किंवा 'मनू'चा आणखी एक परिणाम असा होतो की, एका कालखंडातल्या व विवक्षित प्रदेशातल्या लोकांच्या कल्पकतेची झेप कोठपर्यंत जाईल ह्यावर तो नियंत्रण ठेवतो. ह्या नियंत्रणामुळे त्यांची सरासरी बुद्धिमत्ता ठरते. वेगळ्या शब्दांत सांगायचे प्रत्येकाच्या कल्पकतेला मर्यादा पडते. त्या कालखंडात अपवादात्मकरीत्या फारच थोडे, म्हणजे लाखात एखादा किंवा दहालाखात दोनचार माणसे त्या मर्यादा ओलांडतात. आणि बाकीच्या लोकांना ते 'चक्रम' वाटतात. त्यांचा छळ होतो. युरोपात सॉक्रेटिस, गॅलिलिओ अशी त्यांची काही उदाहरणे आणि भारतात 'चार्वाक' ह्या नावाने ओळखले जाणारे तत्त्वज्ञ ह्यांपैकीच. मन्वंतर जसे जवळ येते तशी ह्या चक्रम लोकांची संख्या वाढते आणि पुढे पुढे बऱ्याच लोकांना नवीन विचार समजू लागतो व मन्वंतर घडते. महाराष्ट्रात ह्याचे उदाहरण पाहायचे असेल तर विधवाविवाहाचे पुरस्कर्ते आणि तो स्वत: करणारे आण्णासाहेब कर्वे ह्यांसारखे लोक आठवावे. अण्णासाहेब कर्व्यांना समाजाने वाळीत टाकले होते. त्यांना त्यांच्या बहिणीला भेटण्याचीसुद्धा सोय नव्हती. म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले ह्यांना झालेला त्रास त्याच प्रकारचा आहे. ह्या सगळ्या घटनांच्या मागे सृष्टिक्रम आहे.

आज मानवजातीपुढे ज्या समस्या आहेत त्यांपैकी एक म्हणजे विषमता, काही लोक अत्यंत श्रीमंत तर काही अत्यंत गरीब; भारतातली दुसरी समस्या म्हणजे जातिसंस्था. त्यामधील उच्च-नीच भाव, आपपरभाव आणि हिंसेने आपले प्रश्न सुटतील हा विश्वास. ह्या विश्वासामुळे मोठमोठी युद्धे होतात. इतकेच नव्हे तर नक्षलवाद्यांशी होणाऱ्या चकमकीही घडतात. कोट्यवधी स्त्रियांना नवऱ्यांचा मार खावा लागतो.

हे सगळे कल्पातांपर्यंत टिकेल असे मुळीच नाही. पण ते टिकू नये ह्यासाठी आम्हाला प्रयत्न करावे लागतील. आणि ते आम्ही जितक्या नेटाने करू त्यावर ह्या 'मनू'चा कालखंड ठरेल. ह्या जगात श्रद्धाळूंची संख्या खूप मोठी आहे. त्यांचे सश्रद्ध असणे अत्यंत स्वाभाविक आहे म्हणून त्यांचा राग करून, त्यांना तुच्छ लेखून चालणार नाही. पण त्याचबरोबर त्यांना तसे राहू देऊनही चालणार नाही. सश्रद्ध मंडळी जुन्याला सोडत नाहीत आणि त्यांना तसेच राहू दिले तर समाजाचे पाऊल पुढे पडत नाही. आपल्या देशात सती-प्रथा होती. विधवाविवाहनिषेध होता. उच्चवर्णीय विधवांची विटंबना केली जात होती व हे सगळे श्रद्धेमुळे घडत होते. आजही अनेक श्रद्धा कायम आहेत. त्या दूर करण्याचा मार्ग मात्र त्रागा करण्याचा नाही. त्या श्रद्धा कश्या चूक आहेत, मनाच्या शृंखला आहेत हे सश्रद्ध लोकांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे. हे काम क्रोधाविष्ट न होता, हळुवारपणे करावे लागणार आहे. सगळ्या श्रद्धांचे आणि जाति-संस्थेचे निर्मूलन सौम्य उपायांनीच होईल.

*श्रीमोहिनीराज, धरमपेठ, नागपूर - ४४००१०*

*भ्रमणध्वनी - ९८८१९००६०८*

■■

# अनश्व रथ, पुष्पक विमान आणि आपण सर्व (लेखांक तीन)

*रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ*

*मागील दोन लेखांत आपण पाहिले की गेल्या शंभर वर्षांत देशातील सर्व पुरोगामी संस्था-संघटना ह्यांची शकले झाली, पण संघ परिवार मात्र चिरेबंद राहिला. पुरोगामी आपल्या चुकांतून काहीच शिकले नाहीत, पण 'हिंदूंचा हिंदुस्थान' ह्या कालबाह्य व अनैसर्गिक संकल्पनेशी निष्ठा कायम ठेवूनही संघ झपाट्याने बदलला. त्याने शेटजी-भटजींचा पक्ष ही आपली प्रतिमा जाणीवपूर्वक बदलली. आजच्या घडीला सुस्पष्ट कार्यक्रम व प्राधान्यक्रम असणारी देशातील एकमेव राजकीय शक्ती रा. स्व. सं. हीच आहे. संघाचा हा अश्वमेधाचा घोडा रोखणे हे देशाच्या बहुविधतेसाठी, तसेच समता-स्वातंत्र्य-बंधुतेवर निष्ठा असणाऱ्या सर्वांसाठी आवश्यक आहे. हिंदुत्वाचा खरा धोका पुरोगाम्यांना किंवा अल्पसंख्याकांना नसून हिंदू धर्म मानणाऱ्यांना आहे. कारण हिंदू धर्म व हिंदुत्व ह्या परस्परविरोधी संकल्पना आहेत. सर्वस त्व, कशालाही न नाकारणारे अघळपघळ मोकळेपण हे हिंदुधर्माचे स्वभाववैशिष्ट्य आहे, तर हिंदुत्वाला त्याचे वावडे आहे. मुळात एकाच देवाला पुजणारा, ठरलेल्या दिवशी देवळात जाऊन ठरावीक पद्धतीने उपासना करणारा एकेश्वरी पंथ हा हिंदुत्ववाद्यांचा आदर्श आहे. मुस्लिमांचे कडवेपण व चर्चची चिरेबंदी रचना ह्यांचे त्यांना अतीव आकर्षण आहे. त्यामुळे हिंदुत्वाचा उदय म्हणजे हिंदू धर्माच्या प्राणतत्त्वाचा नाश.*

भारत हे मुळात एक राष्ट्र नसून अनेकविध राष्ट्रांचा समूह आहे. शेकडो भाषा, हजारो जाती, विविध धर्म, आचार-विचार-विहार-अर्चना ह्यांविषयी कमालीचे विविधत्व असणारा हा खंडप्राय प्रदेश. पण हे केवळ विसंगतीचे गाठोडे नाही. बंदुकीच्या धाकाने किंवा बाजारपेठेच्या आमिषाने एकत्र राहू शकतील असे हे घटक नाहीत. ह्या सर्वांना शेकडो वर्षे बांधून ठेवणारे चिवट-जीवट असे काही सूत्र आहे. हा खंडप्राय देश हा जगाच्या इतिहासातील सहजीवनाचा एक अभूतपूर्व असा प्रयोग आहे. इतकी विविधता अबाधित ठेवून जर हा देश गुण्यागोविंदाने नांदू शकला, तर जगात शांततामय सहजीवनाला भवितव्य आहे.

ह्या देशाला स्वातंत्र्याची स्वप्ने पडू लागली तेव्हा इथल्या द्रष्ट्या नेत्यांना ही जाणीव झाली होती की येथील जात-धर्म-स्त्री-पुरुष भेद व वर्गभेद ह्यांचे ताणेबाणे परस्परांत गुंफलेले आहेत. त्यामुळे ह्यातील कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक सुट्या पद्धतीने करता येणार नाही. ह्या भेदातील विषमता व शोषण नष्ट करायचे, पण बहुविधता टिकवायची, जगण्याच्या प्रश्नांना हात घालायचा, पण अस्मितांकडे दुर्लक्ष करायचे नाही, असा हा अवघड मामला आहे. धर्म-जात-भाषा ह्यांच्या अस्मितांनी उग्र रूप धारण केले तर माणसे सारे काही विसरून मरण्या-मारण्याला तयार होतात, हे त्यांनी अनुभवाने जाणले होते. म्हणून बहुसंख्याकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गांधींसारख्या नेत्याने जगाच्या इतिहासात एक वेगळाच मार्ग चोखाळला. त्यांचा मार्ग विग्रहाचा नसून समन्वयाचा होता. शोषितांच्या दुःखाशी नाते जोडत शोषकांनी स्वतःला बदलावे, अधिक समंजस, संवेदनशील बनावे हा तो मार्ग होता. त्यासाठी शोषक वर्गातील शहाण्या मंडळींना त्यांनी प्रायश्चित्ताच्या भूमिकेत नेले. मानवी विष्ठेच्या नरकात आयुष्य घालविणे किंवा कातडी कमावून इतरांना चामड्याच्या वस्तू वापरता याव्या म्हणून त्या चामड्याच्या वासासोबत जीवन कंठणे काय असते, हे समजण्यासाठी उच्चवर्णीयांनी भंग्याचे किंवा चांभाराचे आयुष्य जगावे अशी प्रेरणा त्यांनी दिली. जातियुद्धाचा नारा न देता शांतपणे देशातील सर्व स्तरांतील नेतृत्व त्यांनी ब्राह्मणांकडून बहुजन समाजाकडे, आजच्या शब्दांत दलितबहुजनांच्याकडे-हस्तांतरित केले. पुरुषसत्तेविरुद्ध एल्गार न पुकारता त्यांनी देशातील लाखो स्त्रियांना स्वातंत्र्यलढ्याच्या संग्रामात माजघरातून थेट रस्त्यावर उतरविले.'हिंदी-हिंदू-हिंदुस्तान'चा आग्रह न धरता मूठभरांच्या संस्कृतनिष्ठ हिंदीऐवजी त्यांनी सर्वांना समजेल, आपलीशी वाटेल अशी 'हिंदुस्तानी' घडविण्याचा, वापरण्याचा आग्रह धरला. ही भाषादेखील दाक्षिणात्यांवर न लादता ती त्यांना आपलीशी वाटावी म्हणून हिंदी तर राज्यांत राष्ट्रभाषाप्रचाराचे व्रत घेऊन हिंदीच्या

स्वयंसेवकांना पाठविले. हा देश केवळ हिंदूंचा नाही, येथील संस्कृती केवळ त्यांची नाही, हे हिंदूंनी समजून घ्यावे ह्याचा आग्रह धरला व अखेरीस त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. कामगार संघटना बांधत असतानाही भांडवलदार वर्गाला 'शहाणे' करण्यावर त्यांनी भर दिला. येथील बहुविधता टिकावी, नव्हे, भारतरूपी सहस्रदलकमळाची एकूण एक पाकळी विकसित व्हावी, म्हणून त्यांनी स्वतंत्र भारताच्या रचनेत दोन गोष्टींचा आग्रह धरला–एक, केंद्रीय सत्ता बलिष्ठ करण्यावर भर न देता मजबूत राज्यांचा समूह–संघराज्य–म्हणून हा देश विकसित व्हावा आणि दोन, प्रत्येक राज्याचा आधार (धर्म वा जाति नसून) भाषा हा असावा.

### भारतातील गंगा–जमनी संस्कृती

स्वतःला जहाल क्रांतिकारी समजणाऱ्या प्रत्येक विचारधारेचे पाईक एक तर गांधी काय करतात हे समजू शकले नाहीत, किंवा गांधींचा मार्ग हा क्रांतीची धार बोथट करण्याचा मार्ग आहे असे त्यांनी मानले. गांधी हे कार्ल मार्क्स किंवा डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारखे धारदार मांडणी करणारे विचारक नव्हते. त्यांचा भर सर्वांना समजून घेत, समजावून सांगत एकत्र आणण्याचा होता. केवळ परकीय सत्तेविरुद्ध लढण्यासाठी नव्हे, तर नंतर एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून नव्या आह्वानांना सामोरे जाताना सर्वांना एकत्र कसे राखता येईल व जात–धर्म–भाषा इ. विविध अस्मिता एकमेकांच्या उरावर न बसता परस्परपूरक कशा ठरतील ह्याचा विचार करूनच त्यांनी आपली ही रणनीती ठरवली होती. बारकाईने विचार केला तर ती ह्या देशाच्या 'स्व'भावाशी सुसंगत होती; आपण ज्याला आज हिंदू धर्म म्हणतो, त्याच्या 'सर्वसमावेशकते'च्या 'निजधर्मा'शीही तिचे जवळचे नाते होते. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे गेली कित्येक शतके ह्या देशातील विविध अंतर्विरोध व विविधता ह्यांना सामावून घेणे येथील समाजव्यवस्थेला शक्य झाले, ह्याचे कारण येथील जनमानसाच्या नसांतून वाहत असणारी, येथील ग्रामकेंद्रित व्यवस्थेतून स्फुरलेली, सातत्याने नव्या–जुन्याची सांगड घालणारी, बहुपेडी, गंगा–जमनी संस्कृती. इथल्या काशी–विश्वेश्वराला रोज जाग येते ती कुणा बिस्मिल्ला खाँच्या शहनाई वादनाने. स्वतःला हिंदुहृदयसम्राट् म्हणविणाऱ्यांच्या नावातील 'साहेब'चे मूळ पर्शियन ह्या म्लेंच्छ भाषेत असते व ज्या भाषेच्या अस्मितेच्या नावाने ते मतांचा जोगवा मागतात त्यातील निम्म्याहून जास्त शब्द अरबी, तुर्की, पर्शियन सारख्या 'परकीय' भाषांतून आलेले असतात. येथील कट्टर हिंदुधर्मीयांच्या 'उपवासा'ला चालणारे बहुतेक पदार्थ – उदा. बटाटा, साबुदाणा, डाळिंब–सफरचंदासारखी बहुतेक फळे, चहा, कॉफीसारखी बहुसंख्य पेये, सुका मेवा – परकीय भूमीतून अलिकडच्या काळात भारतात आलेली असतात व ती त्यांनी आपली मानलेली असतात. इतकी ही सम्मिलित संस्कृती ह्या देशाच्या रक्तात मिसळलेली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि एका नव्या राष्ट्राचा जन्म झाला, ही एक अभूतपूर्व घटना होती. त्यापूर्वी हा खंडप्राय देश एक राष्ट्र म्हणून कधी उभा राहिला नव्हता. स्वातंत्र्यलढ्याच्या सर्व प्रक्रियेत आपण राष्ट्र आहोत म्हणजे नेमके काय आहोत, 'आपण' म्हणजे कोण, आपल्याला स्वातंत्र्य कोणापासून व कशापासून मिळवायचे आहे अशा अनेक प्रश्नांची साधकबाधक चर्चा झाली. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते–हिंदू व मुस्लिम राष्ट्रवादी–स्वातंत्र्यलढ्यापासून दूर राहिले. मार्ग सशस्त्र क्रांतीचा असो की अहिंसात्मक लढ्याचा, रा. स्व. संघ, हिंदू महासभा किंवा मुस्लिम लीग हे सर्व त्यात कोठेही नव्हते. अपवाद करायचा झाल्यास सावरकरांच्या पूर्वायुष्याचा करता येईल. पण काळ्या पाण्याच्या शिक्षेवरून परतल्यावर तेही स्वातंत्र्यलढ्यापासून दूरच राहिले. स्वातंत्र्यसंग्रामात सिंहाचा वाटा अर्थातच गांधीजी व काँग्रेस पक्षाचा होता. पण समाजवादी व साम्यवादी प्रेरणा घेऊन कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांचे ह्या लढ्यातील योगदानही महत्त्वाचे होते. स्वतंत्र भारत कसा असावा ह्याच्या चिंतनात गांधीवादी, समाजवादी–साम्यवादी व आंबेडकरवादी ह्या सर्व विचारप्रवाहांचे मोठे योगदान होते. त्यांचे आपसांतील मतभेद कितीही गंभीर असले तरी स्वातंत्र्य–समता–बंधुता ह्या त्रयीवर आधारलेल्या राष्ट्राची निर्मिती ह्या मुद्द्यांवर त्यांच्यात एकमत होते. अन्यधर्मीयांच्या द्वेषावर आधारित 'स्व'ची संकल्पना व त्या आधारावर आखलेला राष्ट्रवाद ह्या सर्वांना अमान्य होता. इ.स. १९४०–४५ पर्यन्त हा पुरोगामी प्रवाह इतका बलशाली होता की हिंदू व मुस्लिम राष्ट्रवादाला येथे पाय रोवणे कठीण झाले होते. पण स्वातंत्र्य जवळ आले आणि इंग्रजांनी जाणीवपूर्वक पोसलेल्या हिंदू–मुस्लिम दुहीला सुगीचे दिवस आले. द्विराष्ट्रवादाचा

सिद्धांत आधी मांडला सावरकरांनी. त्याचा फायदा मिळाला 'हिंदू आपल्याला सुखाने जगू देणार नाहीत' असा बुद्धिभेद करणाऱ्या मुस्लीम लीगला. सांप्रदायिक दंगे इतके अनावर झाले की त्यापेक्षा फाळणी परवडली, असे म्हणून देशाच्या नेत्यांनी पाकिस्तान निर्मितीला मान्यता दिली. आज फाळणीच्या नावाने गांधी व काँग्रेसच्या नावाने खडे फोडणाऱ्या वीरांनी त्याविरोधात कोणतेही आंदोलन उभारल्याचा पुरावा नाही.

### संघवर्धनाचा अन्वयार्थ

खरे तर बांगलादेशच्या निर्मितीनंतर धर्माधारित राष्ट्रवादाचा सिद्धान्त मोडीत निघाला. वंशशुद्धी व एकारलेल्या राष्ट्रवादाची कलेवरांचे हिटलर व मुसोलिनीबरोबर दफन झाले, पण त्यांना गुरुस्थानी मानणारी व स्थापनेनंतर ७–८ दशके निष्प्रभ ठरलेली रा. स्व. संघासारखी संघटना आज केंद्रात व बहुसंख्य राज्यात सत्तेवर आहे व ह्या देशातील सर्व जाती–जमाती–वर्गात तिच्या पाठीराख्यांची संख्या वेगाने वाढते आहे, ह्याचा अन्वयार्थ आपण कसा लावणार?

ह्याच्या अपश्रेयाचा सर्वांत मोठा मानकरी(?) आहे कॉंग्रेस पक्ष. खरे तर १९३०च्या दशकातील प्रांतिक सरकारांच्या अनुभवावरून गांधीजी सावध झाले होते व स्वातंत्र्यानंतर सत्ता मिळाल्यावर काँग्रेसवाले किती भ्रष्ट व निगरगट्ट होऊ शकतात ह्याचा त्यांना अंदाज आला होता. त्यामुळेच त्यांनी स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्ष खालसा करण्याची सूचना केली होती. पण फाळणीने डागाळलेले स्वातंत्र्य मिळाल्यावर लागलेल्या दंग्यांची आग विझविण्यात त्यांची शक्ती खर्च पडली व त्यापाठोपाठ हिंदू राष्ट्रवादाच्या पुरस्कर्त्यांनी त्यांची निर्घृण हत्या केली. काँग्रेसने त्यांच्या मृत्यूचे भरपूर भांडवल केले. त्यांच्या नावावर सत्तेचा यथेच्छ उपभोगही घेतला. त्यांच्या नावाची माळ जपत त्यांच्या तत्त्वांना पायदळी तुडविण्याचे कार्य ह्या पक्षाने इमाने इतबारे केले. जनता दलाचा प्रयोग फसल्यावर जितकी काही बिगर काँग्रेसी सरकारे केंद्रात किंवा राज्यांत आली, ती एक तर अंतर्गत वादांमुळे कोसळली किंवा काँग्रेसी संस्कृतीची सारी वैशिष्ट्ये, उदा. घराणेशाही, भ्रष्टाचार, दिल्लीश्वरांचे लांगूलचालन, लोकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष व दरबारी राजकारणावर भर–त्यांनी आत्मसात केली. ठोस पर्यायांच्या अभावामुळे तर काँग्रेसची मस्ती अधिकच वाढली. गरीब, दलित, अल्पसंख्य, पुरोगामी इ. मतदार आपल्यशिवाय जाणार कुठे? अशा गुर्मीत वागणाऱ्या अशा काँग्रेसला पर्याय मिळताच आता मतदारांनी धडा शिकवला आहे.

आपला खरा वारसा टाकून देऊन देशाला संघ परिवाराच्या कृतक अस्मितांच्या गर्तेत ढकलण्याच्या अपश्रेयाचे दुसरे मानकरी (?) आहेत तथाकथित गांधीवादी. त्यांतही सरकारी गांधीवादी, संधिसाधू गांधीवादी, संस्थाबद्ध गांधीवादी असे पोटभेद आहेत. पण ह्या सर्वांनी मिळून जाणतेपणी किंवा अजाणता एक गोष्ट केली, ती म्हणजे खरा गांधी लोकांपासून दडवून ठेवला. एक गुळगुळीत, निरुपद्रवी, त्याच्या तीन माकडांप्रमाणे जगातील साऱ्या असत्य–विद्रूप–अमंगल गोष्टींकडे दुर्लक्ष करून भजन करणारा गांधी त्यांनी लोकांपुढे ठेवला. गांधींची प्रतीके–मग ती खादी असो, ग्रामसफाई असो की ग्रामोद्योग–त्यामागील राजकीय आशय काढून घेऊन त्यांची कलेवरे गांधीभक्तांनी सजवली. त्यामुळे राष्ट्रपित्याला आपली मानणारी मुलेच ह्या देशात उरली नाहीत. हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी गांधींनी प्राण वेचले, पण आज कोणाही मुस्लिम नेत्याला त्यांच्याविषयी कृतज्ञता वाटत नाही. बहुजनसमाजाला सत्तेकडे नेणाऱ्या मार्गाचा आराखडा त्यांनी बनवला. ग्रामोद्योगाला चालना देणे म्हणजे सर्व उत्पादक जातींना उत्पादनव्यवस्थेत न्याय्य वाटा मिळवून देणे; काँग्रेस संघटनेचे लोकशाहीकरण म्हणजे दलित–आदिवासी–बहुजनांना राजकीय सत्तेत सहभाग व नेतृत्व देणे; अशी त्यांची भूमिका होती. मात्र बहुजनांना गांधींबद्दल कसलेच प्रेम नाही. गांधींच्या अस्पृश्यताविरोधी लढ्याच्या अनेक मर्यादा असतील, पण सवर्णांच्या जाणीवजागृतीचा त्यांचा प्रयत्न हा बाबासाहेब आंबेडकरांच्या शोषितांच्या रींशर्थींळेप च्या लढ्याला पूरक होता, हे नाकारून चालणार नाही. मात्र आज दलितांच्या मते ब्राह्मणवादाचे प्रतीक संघपरिवार नसून गांधी आहे. लाखो स्त्रियांना देशाच्या स्वातंत्र्याच्या राजकीय लढ्यात सामील करणे, अहिंसा, सेवावृत्ती व संवेदनशीलता ह्या 'बायकी' गणल्या जाणाऱ्या गुणविशेषांना राजकीय लढ्यात महत्त्वाचे स्थान देणे हे गांधींचे विशेष योगदान. पण त्याची बूज स्त्री–अभ्यासकांनी किंवा स्त्री–आंदोलनाने ठेवली नाही. ह्याचे कारण गांधींनी ह्या समाज घटकांसाठी काय केले ह्याचे विश्लेषण गांधीवाद्यांनी त्यांच्यासमोर ठेवले नाही. रचनात्मक काम करणाऱ्या

अनेकांनी त्यासाठी आपली आयुष्ये वेचली, पण त्यांच्या कामाचा सांधा त्यांना बदलत्या समाजजीवनाशी जुळविता आला नाही. एकूण गांधी हा एक आदर्शवादी, कालबाह्य वेडाफकीर होता, असाच निष्कर्ष गेल्या तीन पिढ्यांनी काढला आणि गांधींकडे व त्यांच्या विचारांकडे पाठ फिरवली. ह्यासाठी गांधीवादी प्रामुख्याने जबाबदार आहेत.

## परंपरा व पुरोगामित्व

संघविचाराला भारतीय विमर्शाच्या केंद्रस्थानी आणून बसविण्यात सर्वांत जास्त हातभार लावला आहे तो स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या आक्रमक वाचावीरांनी. सांसदीय राजकारणातील आपली नेमकी भूमिका त्यांना कधीच सापडली नाही. काँग्रेसला विटलेल्या जनतेने अनेकदा त्यांना सत्ता दिली, पण ती टिकविणे त्यांना जमले नाही. मिळालेली सत्ता पूर्ण काळ भोगणेही त्यांना शक्य झाले नाही. त्याना विग्रह–वजाबाकीचे राजकारण समजले, पण बेरजेचे राजकारण कधी उमजले नाही. त्यातील बहुतेकांनी गांधी समजून न घेताच त्याच्यावर फुली मारली. कारण गांधी समजून घेणे म्हणजे ह्या देशाची गुंतागुंतीची परंपरा समजून घेणे. पुरोगाम्यांना वारसा लाभला एकोणिसाव्या–विसाव्या शतकातील सामाजिक सुधारकांचा. आपल्या परंपरेतील त्याज्य काय आहे, हे त्यांना बरोबर माहीत आहे व त्याविरुद्धचा त्यांचा संतापही रास्त आहे. पण जणू काही आपणच ह्या भरतखंडातील आद्य बंडखोर असा त्यांचा आविर्भाव असतो. परंपरेविरुद्ध विद्रोहाचीही एक परंपरा असते, भारतासारख्या प्राचीन देशात तर ती अतिशय जोरकस असते व ह्या विद्रोहाच्या परंपरेशी नाते जुळविल्यानेच आपला विद्रोह समाजात स्वीकारला जाऊ शकतो, हे भान त्यांना राहिले नाही व ह्याचा सर्वांत जास्त लाभ संघपरिवाराला मिळाला. परंपरेविषयी अभिमान ही प्रत्येक समाजाची दुखरी जागा असते. त्यात अडकून पडून वर्तमानाकडे दुर्लक्ष करू नये, त्यातील त्याज्य भाग उराशी कवटाळू नये, त्यासाठी मूल्यविवेक वापरावा, ह्याचा आग्रह धरताना त्यातील समृद्ध बाबी आमच्या आहेत, हे देखील ठामपणे सांगितले, तरच समाजाला तुमच्याविषयी विश्वास वाटतो. आपल्या परंपरेत योग, आयुर्वेद, प्राचीनदर्शने, शास्त्रीय कला, कैलास–अजिंठा व ताजमहाल–लाल किल्ल्यासारखे स्थापत्याचे आविष्कार, लोककला अश्या अनेक अभिमानास्पद बाबी आहेत. दुर्दैव असे की त्या पश्चिमेत प्रतिष्ठा पावल्या की मगच आपल्याला त्यांचे महत्त्व वाटते. ह्या देशात प्राचीन काळी खरोखर समृद्धी होती. ज्ञान–तंत्रज्ञान विकसित होते. कला–मानव्यशास्त्रेदेखील प्रगत होती. बौद्धकाळात तर आपली वैचारिक समृद्धी चरमावास्थेला पोहचली होती. तेव्हापासून अठराव्या–एकोणिसाव्या शतकापर्यंत परकीयांनी लुटून नेण्यासारखे आपल्याकडे खूप काही होते, हा इतिहास आहे. त्याचा अभिमान बाळगत असतानाच आपण सातत्याने पराजित का होत राहिलो, आपली ज्ञान–तंत्रज्ञानाची परंपरा लुप्त केव्हा व का झाली, मानवतेला काळिमा लावणाऱ्या रूढी–परंपरा आपल्या रक्तात कशा रुजल्या ह्याचा सातत्याने शोध घेणे ही आपली समाज म्हणून, राष्ट्र म्हणून जबाबदारी आहे. होते असे की संघपरिवार सोन्याचा धूर, अनश्व रथ, पुष्पक विमान अश्या फँटसीत रमतो व जे काही त्याज्य आहे, ते परकीयांकडून आले, असे म्हणून जबाबदारी झटकतो. शंबूक, एकलव्य, चिलया बाळ व सीतात्याग ह्यांचे काय करावे हे त्यांना कळत नाही. ह्याविरुद्ध, आमचे पुरोगामी, परंपरा म्हणजे जणू बाजारगप्पा आहेत, असे मानून त्यांच्याकडे पाठ फिरवितात. धर्म ह्या गोष्टीची तर त्यांना इतकी ॲलर्जी आहे की खुद्द कार्ल मार्क्सच्या त्या सुप्रसिद्ध वचनाचा पूर्वार्ध ते सोयीस्कर रीत्या विसरून जातात. मार्क्स म्हणाला होता–धार्मिक वेदना ही एकाच वेळी खऱ्याखुऱ्या वेदनेचा आविष्कार व खऱ्या वेदनेविरुद्ध उठविलेला आवाज आहे. धर्म हा दबल्या पिचलेल्यांचा हुंदका, बेदर्द दुनियेचे हृदय, तसेच आत्मा गमाविलेल्या व्यवस्थेचा आत्मा आहे. ती जनसामान्यांची अफू आहे. ह्यातील 'अफू'वरच लक्ष केंद्रित केल्यामुळे धर्माच्या विधायक भूमिकेकडे दुर्लक्ष होते. सर्वसामान्य माणसाला दुःखात, संकटांत आधार वाटू शकेल अशा प्रति–ईश्वराची निर्मिती न करताच धर्म व ईश्वराला 'रिटायर्ड' करणे शक्य नाही, हे न कळल्यामुळे पुरोगामी ह्या देशात कालबाह्य होऊ लागले आहेत. त्यामुळे हा देश ह्यातील सर्व परंपरांसह त्यांनी संघाला आंदण दिला आहे की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती त्यांनीच निर्माण करून ठेवली आहे. विवेकानंदांसारखा भाकरीचे तत्त्वज्ञान मांडणारा व येशू ख्रिस्त–पैगंबरांचे माहात्म्य समर्थपणे मांडणारा आधुनिक संतही त्यांनी न वाचताच नाकारला. मग संघपरिवाराने त्याला आपल्या कवेत घेऊन हिंदुत्वाचा प्रणेता केले, ह्यात आश्चर्य ते कोणते?

गेल्या २३ वर्षांत आपण स्वीकारलेल्या खाजगीकरण–उदारीकरण–जागतिकीकरण (खा–उ–जा)चे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अतिशय खोल व दूरगामी परिणाम झाले आहेत. भल्याबुऱ्या कोणत्याही मार्गाने पैसा मिळविणे हेच सर्वांत मोठे मूल्य मानले जाऊ लागले आहे. सांस्कृतिक सपाटीकरण व एकजिनसीकरणाची प्रक्रिया जगभरात वेगाने सुरू झाली आहे. स्थानिक भाषा, संस्कृती कोंडीत सापडल्या आहेत. काही तर नामशेषही झाल्या आहेत. माणसे कमालीची असुरक्षित बनली की मग ती अस्मितेच्या भोवऱ्यात सापडतात. जात–धर्म–कालबाह्य रूढी–परंपरा ह्यांत आपले स्वत्व, ओळख व निवारा शोधू लागतात. जगभरात धार्मिक पुनरुज्जीवनाची लाट आली, तशीच ती भारतातही दाखल झाली. त्यामुळे धर्माचे बाजारीकरण झाले. आसारामबापूसारखे 'संत' पूजनीय बनले. ह्यामागील जनसामान्यांची मानसिकता लक्षात न घेता धर्मावरच हल्ला चढविल्यामुळे आज सर्वसामान्य जन हे पुरोगामी संघटना–चळवळींपासून दुरावले आहेत. त्यांना संघविचार मनापासून पटतो असे नाही, पण पुरोगाम्यांची वृत्ती त्यांना संघ–विचाराकडे लोटते, हे आपण विसरून चालणार नाही.

काँग्रेसचे नाकर्तेपण, डाव्यांची नेहमीची संभ्रमावस्था व जागतिकीकरणामुळे अस्मितेच्या राजकारणालाआलेले उधाण ह्याचा पुरेपूर फायदा संघपरिवाराने उठवला. त्याचबरोबर जवळजवळ सहा–सात दशके त्यांनी सत्तेपासून दूर राहून उमेदवारी केली, ह्याचे श्रेय त्यांना द्यायलाच हवे. 'रा. स्व. संघ हा तरुणाईचे लोणचे घालण्याचा कारखाना आहे' असे एक विचारवंत म्हणत असत. हे खरे आहे. संघात डोके बंद करण्याची प्रक्रिया अतिशय सफाईने चालवली जाते. त्यामुळे स्वतंत्र विचार करू शकणारी, प्रज्ञावंत मंडळी संघविचाराच्या आसपास फिरकत नाहीत. पण ह्या विचारांशी निष्ठा बाळगून लाखो तरुण–प्रौढ व्यक्तींनी स्वतःला संघाच्या कामात समर्पित केले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. लहानपणी घडणारे संस्कार नंतर वज्रलेप बनतात, ह्या साध्या सिद्धान्तावर संघाचा पाया रचला गेला. त्याच तत्त्वाने मुलांवर लहानपणीच डोके खुले ठेवण्याचे, प्रश्न विचारण्याचे संस्कार करणे शक्य आहे. राष्ट्र सेवा दलाची निर्मितीही लरींलह ींहशा ूींपस ह्याच विचाराने झाली होती व त्याने पुरोगामी विचारांना बळदेखील पुरविले होते. आज सेवादल मृतवत् झाले आहे, पण संघ जोरात आहे, कारण तो तिथेच थांबला नाही. जी व्यक्ती जिथे असेल तिथे राहून ती संघविचाराला पूरक काय करू शकेल, ह्याचा बारकाईने विचार संघाने केला आहे. त्यामुळे शाखेबाहेरील लाखो कार्यकर्ते व कोट्यवधी सहानुभूतिदार त्यांना मिळविता आले व विशेष म्हणजे टिकविता आले.माणसे कशी जोडावीत हा एक धडा तरी पुरोगाम्यांनी संघाकडून घेतलाच पाहिजे. कारण त्यांचे स्पेशलायझेशन विचारधारेच्या नावाने माणसे तोडण्यात आहे.

आज संघाजवळ सुस्पष्ट कार्यक्रम आहे, मोदींसारखे धूर्त, मायावी नेतृत्व आहे व जनमताचा सावध पाठिंबा आहे. पण तेवढ्या आधारावर हिंदुराष्ट्रनिर्मितीच्या ध्येयापर्यंत पोहोचणे शक्य नाही, ह्याचे भानही त्यांना आहे. राजकीयदृष्ट्या अधिक शक्तिशाली पायावर उभे राहिल्यावर आपण ते करूच, हेदेखील संघाला माहीत आहे. ह्याविषयी अंधारात आहेत ते पुरोगामी प्रवाह. म्हणूनच दहा तोंडाने बोलणाऱ्या संघाचे कुठले तरी एक वचन ग्राह्य धरून ते भरकटत जातात किंवा संघ/मोदी आता मवाळ झालेत असे मानून गाफील राहतात. पाण्याचे तापमान एकदम वाढवले तर चटके असह्य होऊन लोक त्याबाहेर उड्या मारतात, पण ते हळूहळू वाढविले तर लोकांना त्याची सवय होते हे संघाला नीट माहीत आहे. म्हणूनच मोदी भाषा वरकरणी मवाळ करून गांधींचा सोयीस्कर जप करू लागले आहेत. मोहन भागवतांच्या दसरा–प्रवचनात त्यांनी भारताच्या महान विभूतींमध्ये गांधी, विनोबा, जयप्रकाश नारायण ह्यांची नावे घेतली. पण त्याचवेळी संघाने राममंदिराचा, लव्ह जिहादचा मुद्दा सोडलेला नाही. वेंडी डोनिजरच्या पुस्तकावर घातलेली बंदी, त्यापाठोपाठ गुजरात–दंगलीसारख्या अनेक संवेदनशील विषयांवरील पुस्तकांच्या प्रकाशकांनी घेतलेली माघार, दिनानाथ बात्रांचे 'शैक्षणिक प्रयोग', छोट्या छोट्या दंग्यांतून सांप्रदायिक वातावरण धुमसत ठेवण्याची संघाची रणनीती ह्या बाबी आपल्याला काय सांगतात? साईबाबांची पूजा करू नका, असा 'फतवा' निघाला. आता लौकरच सुफी संत, हिंदूंना पूजनीय असणारी पीराची ठिकाणे ह्यांची पाळी येईल. हिंदू–मुस्लिम सामाईक संस्कृतीच्या एकेक प्रतीकावर विचारपूर्वक हल्ला होईल. पूर्वी दिलीपकुमार मुसलमान म्हणून त्याच्या बदनामीचे बरेच प्रयत्न करून झाले.

शर्मिला टागोरने एका यवनाशी लग्न केले, म्हणून तिच्यावर व पतौडीवर चिखलफेक करून झाली. आता आंतर–धर्मीय विवाह (म्हणजे अर्थातच हिंदू मुलगी व मुसलमान मुलगा) करणाऱ्या सेलेब्रिटीना लक्ष्य केले जाईल. 'एक दिवस भारतात हिंदू अल्पसंख्य होतील', 'गांधींनी पाकिस्तानला ५५ कोटी दिल्यामुळे त्यांचा 'वध' करावा लागला', 'मोदी हे जगाच्या पाठीवरचे, किंबहुना मानवी इतिहासातले सर्वांत लोकप्रिय नेते आहेत'– ह्या व अश्या कंड्या आंतरजालावर व सोशल मीडियात वारंवार पिकवल्या जातील.एरव्ही हिंदुराष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाकडे वाटचाल करताना संघपरिवार एकटा पडला असता. पण आता संघाच्या गाडीला मोदींचे इंजिन जोडले गेले आहे. जागतिकीकरणाची सारी ऊर्जा हिंदुराष्ट्रनिर्मितीसाठी वापरण्याची त्यांची रणनीती आहे. भारताची नैसर्गिक संसाधने जर वापरण्यास मिळणार असतील, भारताची बाजारपेठ व कवडीमोलाने मिळणारा बांधीव कामगारवर्ग सहज उपलब्ध होणार असतील, तरअमेरिका भारतातील धर्मनिरपेक्षतेचे, लोकशाहीचे काय होते ह्याची फिकीर करणार नाही, हे त्यांनी हेरले आहे. उलट ज्या मोदींना व्हिसा नाकारला, त्यांना निरंकुश सत्ता मिळावी, ह्यासाठी आपले सामर्थ्य त्यांच्यामागे उभे करण्यास ती मागे–पुढे पाहणार नाही ह्याचीही त्यांना खात्री आहे. म्हणूनच हिंदुराष्ट्रनिर्मितीच्या रस्त्यावरील अडचणी दूर करण्यात संघपरिवार गुंतला असताना खुद्द मोदी आपला लक्ष्यविकासाचा रथ सुसाट कसा दौडेल ह्याची काळजी वाहण्यात आपली ऊर्जा खर्च करतील.'मेक इन इंडिया'च्या नावाखाली आता भारतातील सारी नैसर्गिक संसाधने जल–जंगल–जमीन–खनिजे – बहुराष्ट्रीय कंपन्यांना कवडीमोलाने खुली करून दिली जातील. पर्यावरणाच्या मुद्द्यावरून विकासाचा कोणताही प्रकल्प रोखला जाणार नाही ह्याची यथोचित काळजी विकासपुरुष घेतील. एकात्मिक मानवतावाद व ग्रामीण विकासाचा जप करीत शेतकऱ्याला शेतजमिनीवरून बेदखल करण्याचा कार्यक्रम राबविला जाईल. नरेगा, पर्यावरणसुरक्षा अधिनियम, माहितीचा अधिकार, लोकपाल, भूमि–संपादन–अधिनियम ह्यांसारखे देशातील गरिबांच्या हिताचे, लोकशाही मजबूत बनविणारे कायदे, योजना गुंडाळून ठेवले जातील, किंवा त्यांना पुरेसे पातळ करण्यात येईल. जागतिकीकरणाची फळ चाखणारा मध्यमवर्ग, केव्हाच विकली गेलेली संचारमाध्यमे ह्या सर्व बाबींचे सहर्ष स्वागत करेल. प्रश्न उरतो तो फक्त निम्न मध्यमवर्ग व गरिबांचा.(त्यातील बहुसंख्य संघाच्या व्याख्येनुसार हिंदू!) पण विकासाच्या वेदीवर कुणाला तरी बलिदान करावे लागेल आणि बळी नेहमी अजापुत्राचा देतात हे हिंदुधर्मनिष्ठांना कोणी सांगायला नको.

अर्थात हे करताना संघाची मदार असेल आपल्या गोबेल्स तंत्रावर आणि संघ विरोधकांच्या विखुरलेपणावर. 'आधी जातीअंत की वर्गसंघर्ष?', 'दलितांचे खरे शत्रू गांधीच', 'समाजवादी एकजुटीचे पहिले पाऊल कोणते?', 'फुले–आंबेडकर की मार्क्स–फुले–आंबेडकर की मार्क्स–माओ की शिवाजी–फुले–आंबेडकर की नुसते आंबेडकर?' अशा अंतहीन व अति–महत्त्वाच्या विमर्शात अडकलेल्या मंडळीना आपल्यातला एकेक जण कमी होतोय हे भान आपली स्वतःची पाळी येईपर्यंत येणार नाही, हे संघपरिवार जाणून आहे.

चौखूर उधळलेला हिंदुत्वाचा अश्व ठाणबंद व जेरबंद करणे ही काळाची गरज आहे. कारण तसे न झाल्यास भारताची शकले होण्यास वेळ लागणार नाही. निव्वळ बंदुकीच्या धाकाने विविध समाजघटक एकत्र नांदू शकत नाहीत. पूर्वीही ते शक्य नव्हते. आता माध्यमस्फोटांच्या काळात ते केवळ अशक्य आहे. बाजाराच्या लालसेने ते एकत्र राहतील किंवा कोट्यवधी अजापुत्रांचा बळी सोयिस्करपणे विसरला जाईल, अशी वल्गना कोणी केली, तरी तसे घडण्याची शक्यता नाही. त्यामुळे उरतो तो एकच मार्ग, ज्या मार्गाने चालत जाऊन ह्या देशाने कित्येक सहस्रकांची वाटचाल केली. 'तेच पतित की जे आखडती प्रदेश साकल्याचा'. सकलांना कवेत घेऊन, सर्वांना आपले मानून मार्गक्रमण करण्याचा. सर्वसमावेशकतेचा, अर्थपूर्ण सहजीवनाचा.

हिंदुत्व की सहजीवन हा निर्णय आपल्याला करायचा आहे, आणि आपल्याजवळ फारसा वेळ उरलेला नाही.

*'अमलताश', प्रहार शाळेसमोर, बँक ऑफ इंडिया कॉलनी, नालवाडी, वर्धा ४४२००१*

ravindrarup@gmail.com

# एक प्राचीन स्थलांतर

*सुकल्प कारंजेकर*

ही कथा आहे प्राचीन काळात माझ्या पूर्वजांनी केलेल्या स्थलांतराची. माझ्या पूर्वजांच्या प्रवासाची कथा असली तरी ती वैयक्तिक मात्र नाही.

आपल्यापैकी बहुतांश लोकांना पूर्वजांच्या ४–५ पिढ्यांची माहिती असते. काही लोकांना कदाचित मागल्या ८–१० पिढ्या माहीत असतील. मात्र एका मर्यादेपलीकडे आपण जाऊ शकत नाही. जरी आपल्याला त्यांचे नाव माहीत नाही तरीही इतिहासाच्या प्रवासातील प्रत्येक वळणावरून आपल्या पूर्वजांनी प्रवास केला आहे–शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक, वास्को दा गामाचे भारतातील पहिले आगमन, मुहम्मद पैगंबर, गौतम बुद्धाचा पृथ्वीतलावरील वावर, अजिंठा–वेरूळच्या लेण्यांची रचना, पिरेमिड्स चे बांधकाम, शेतीचा, अग्नीचा शोध ह्या घटना ज्या ज्या काळात घडल्या त्या त्या काळात आपल्या सगळ्यांचे पूर्वज अस्तित्वात होते.

आज जे लोक जिवंत आहेत त्यांच्या पूर्वजांनी पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या उगमापासून तो आजपर्यंतच्या ३५०–४०० कोटी वर्षांत, एका प्रजातीपासून ते दुसऱ्या प्रजातीपर्यंत वाहणाऱ्या उत्क्रांतीच्या प्रवाहातून, ५ मोठ्या व असंख्य छोट्या विनाशांतून (mass-extinctions)आणि भूखंड अपवहनामुळे (continental drift) सतत बदलणाऱ्या भूतलाच्या रंगामंचावरून धैर्याने प्रवास केला आहे. ६६ कोटी वर्षांपूर्वी जो उल्काखंड पृथ्वीवर कोसळून डायनासोरसारखे शक्तिशाली जीव नष्ट झाले, तिथे आपले पूर्वज मात्र वाचले. किंबहुना आज आपण जिवंत आहोत याचाच अर्थ असा की आजापावतो झालेल्या अनेक विनाशांमध्ये ९८–९९ टक्के प्रजाती नष्ट होऊनही ज्या १–२ टक्के प्रजाती शिल्लक राहिल्या, त्यांत आपला समावेश होतो. अर्थात ह्या उत्क्रांतीच्या प्रवासात, वेगवेगळ्या काळात आपले पूर्वज हे वेगवेगळ्या प्रजातींमध्ये समाविष्ट होते. येथे आपल्या पूर्वजांनी किती प्रजाती बदलल्या ह्याला फारसे महत्त्व नाही. जीवसृष्टीचा उत्क्रांतिप्रवास हा सलग असतो, त्यात एका प्रजातीतून दुसऱ्या प्रजातीकडे अश्या तुटक पायऱ्या नसतात.

ज्याला आपण मनुष्यप्रजाती म्हणतो तिचा उगम आफ्रिकाखंडात झाला. आफ्रिकाखंड हे माकडाच्या वेगवेगळ्या प्रजातींचे उगमस्थान आहे. आपली मनुष्यजातही इथेच जन्माला आली आणि विकसित झाली. उत्पत्तीनंतर बहुतांश काळ ती आफ्रिकेतच निवासाला होती. नंतरच्या काळात बदलते हवामान, त्याचा समुद्रपातळीवरचा प्रभाव, आपण ज्या प्राण्यांची अन्नासाठी शिकार करीत असू त्यांचे बदलत्या हवामानानुळे झालेले स्थलांतर व त्यांचा पाठलाग करताना माणसाचे स्थलांतर अशा अनेक कारणांमुळे मनुष्यप्राणी आफ्रिकेतून हळूहळू बाहेर पडून इतर खंडांवर पसरू लागला. बघता बघता पृथ्वीच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत माणसाने आपले पाय रोवले. (ह्यानंतर कोणी तुम्हाला 'तुमचे पूर्वज कुठे राहत होते?' असा प्रश्न विचारल्यास त्यांना बिनधोक 'आफ्रिकेत' असे उत्तर द्यावे, कारण भूतकाळाकडे जाणारे सर्व रस्ते आफ्रिकेत मिळतात.)

प्राचीन काळात मनुष्यप्राण्याची जी स्थलांतरे झाली त्यांची चिह्ने आपण आज शोधू शकतो का? असा प्रश्न मला नेहमी सतावत असे. त्याचे उत्तर शोधत असताना मला नॅशनल जिओग्राफ्रिक तर्फे मोठ्या स्तरावर केल्या जाणाऱ्या एका प्रयोगाबद्दल माहिती मिळाली. त्यामध्ये एखाद्या माणसाचे मूळ व त्यानंतरचा त्याच्या पूर्वजांचा प्रवास ह्यांचा जननशास्त्राच्या (population genetics) मदतीने शोध घेतला जात होता. कुतूहलापोटी मी ह्या प्रयोगात सहभागी व्हायचे ठरविले. ह्या संशोधनाचा भाग म्हणून माझ्या डीएनएच्या नमुन्याचे परीक्षण करण्यात आले. त्यातूनच माझ्या पूर्वजांनी गेल्या ६०–७० हजार वर्षांत केलेल्या भ्रमंतीची गोष्ट पुढे आली. ह्या लेखात तीच गोष्ट थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या गालाच्या आतल्या भागातून, कापसाने झाकलेल्या, कान कोरायला वापरतात तशा काडीच्या मदतीने घेतलेला डीएनएचा नमुना हजारो वर्षांचा इतिहास उलगडून दाखवतो हे विस्मयकारीच नव्हे काय. तर त्यामागील विज्ञान आधी थोडक्यात समजून घेऊ या.

आपल्याला साधारण निरीक्षणातून असे दिसून येते की अनेक पिढ्यांपासून एकाच प्रदेशात राहणारे लोक हे दुसऱ्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांशी तुलना करता ढोबळमानाने बरेचसे सारखे दिसतात. उदाहरणार्थ दक्षिण भारतात राहणारे लोक हे उत्तर–पूर्वेकडे राहणाऱ्या लोकांपेक्षा वेगळे दिसतात. आपले दिसणे आणि इतर अनेक गुणधर्म हे डीएनएवर अवलंबून असतात. एका भागात राहणाऱ्या लोकांमध्ये त्याच भागातील लोकांशी लग्न होण्याची शक्यता जास्त असते आणि ठरावीक प्रदेशातील लोकांचे शारीरिक गुणधर्म हे डीएनएमधील विशिष्ट खुणांवर अवलंबून असतात. डीएनएमधील ह्या खुणा आनुवंशिकतेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला मिळतात.

डीएनए हे पाककृतीच्या पुस्तकासारखे असते. त्या पुस्तकात एखादी पाककृती करण्यासाठी लागणाऱ्या सूचनांची यादी असावी तशीच डीएनएमध्ये आपल्या जडण–घडणीसाठी आवश्यक असणाऱ्या व आपले गुणधर्म निश्चित करणाऱ्या सूचनांची यादी असते. प्रत्येक नव्या पिढीनुरूप ह्या यादीची नक्कल केली जाते. डीएनएमधील सूचनांची क्लिष्टता लक्षात घेता ही विलक्षण प्रभावी नक्कल असते. पण ती १०० टक्के अचूक मात्र असू शकत नाही. प्रत्येक नव्या पिढीबरोबर, अगदी किरकोळ परंतु मोजता येण्याइतपत चुका ह्या प्रक्रियेत होतात. (ढोबळमानाने एका जनुकामध्ये, एका पिढीत १०० चुका होतात). ह्या चुका उत्क्रांतीचे गाडे चालण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. अर्थात सगळ्याच चुका उपयुक्त असतात असेही नाही. काही चुका तर हानिकारक वा निरुपयोगीही असू शकतात. आपल्या पूर्वजांची पाळेमुळे शोधताना ह्या चुकांची मदत घेतली जाते. दोन माणसांच्या डीएनएमध्ये जर अगदी एकसारख्याच चुका आढळून आल्या, तर त्यांचे पूर्वज एकच होते असा निष्कर्ष काढता येतो. (इथे मला माझ्या अभियांत्रिकी शिक्षणाच्या वेळेची आठवण येते. सत्र संपण्यापूर्वी होणाऱ्या सबमिशनच्या वेळी मुले एखाद्या ठिकाणी जमून प्रयोगांच्या लेखनाची नक्कल करायची. एकीकडे रेडीओ वर गाणी चालू असायची तर दुसरीकडे ही नक्कल. अशा वेळेला मूळ लिखाणात एखादी चूक असल्यास तीच सर्वांच्या वह्यांमध्ये तशीच्या तशी यायची. ती पाहून त्या मुलांच्या चुकांचे मूळ कोणते व ते कोठून आलेले आहे हे चाणाक्ष प्राध्यापकांच्या लगेच लक्षात येत असे.)

त्याच धर्तीवर, डीएनएमधील चुकांचा सखोल अभ्यास केल्यास त्यांच्या मदतीने मानवजातीचा वंशवृक्ष बनविता येतो. वेगवेगळ्या प्रदेशातील माणसे ही वरवरच्या निरीक्षणातून फार वेगळी भासतात. चीनमधली महिला ही एखाद्या एस्किमो महिलेपेक्षा अगदी वेगळी दिसते. परंतू डीएनएच्या स्तरावर माणसामाणसांतले हे बदल फारच नगण्य होत. मनुष्यजातीचे ९९.९९ टक्के डीएनए एकसारखे आहेत. डीएनएमधील ही समानता विलक्षण आहे. उत्क्रांतीमधील आपले नातलग असलेल्या चिम्पान्झी, ओरांगउटांग व गोरिला वानरांमध्ये माणसाच्या तुलनेत ४ ते १० पट जास्त विविधता आढळून येते. मग माणसांमध्ये इतकी समानता कशी? ह्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये भूतकाळातील एका विनाशाची चित्रे लपलेली आहेत. एका सिद्धांतानुसार, अंदाजे ७०,००० वर्षांआधी माणसांची संख्या ही केवळ काही हजार इतक्या धोकादायक पातळीपर्यंत घसरली होती. येणाऱ्या काळात माणसांची संख्या वाढली व आपली प्रजाती नष्ट होणाच्या धोक्यापासून वाचली. आपल्या डीएनएमधील समानतेमध्ये ह्या संकटाचीच छाया दिसते. मनुष्यवंश शोधण्याच्या प्रयोगात वडिलांकडून येणारे गुणसूत्र (Y Chromosome) व आईकडून मिळणाऱ्या डीएनए (Mitochondrial DN ) यांचा अभ्यास केला जातो. ह्याद्वारे वडिलांच्या बाजूच पूर्वज आणि आईच्या बाजूचे पूर्वज अशा दोन्हींचा अभ्यास होतो.

माझ्या डीएनए अभ्यासातून पुढे आलेल्या ठळक घटना अशा –

आईकडील बाजू –

१) जगातल्या सर्व महिलांचे मूळ हे पूर्व आफ्रिकेत अंदाजे १८०,००० वर्षांपूर्वी राहणाऱ्या आद्य स्त्रीत शोधता येते. तिला जननशास्त्रीय ईव म्हणता येईल. (Mitochondrial Eve)

२) आईकडच्या पूर्वजांचे आफ्रिकेतून स्थलांतर हे अंदाजे ६७,००० वर्षांपूर्वी सुरू झाले.

३) त्या पूर्वजांचा एक भाग अंदाजे ६०,००० वर्षांपूर्वी सिनाई द्वीपकल्पाजवळ पोचला.

४) दुसरा एक भाग अंदाजे ५५,००० वर्षांपूर्वी पश्चिम आशिया व अनातोलिया भागात पोचला.

५) एक भाग ४७,००० वर्षांपूर्वी पश्चिम आशियामध्ये वसला.
६) त्यांचे अंदाजे ३८,००० वर्षांपूर्वी दक्षिण आशिया व भारताकडे आगमन झाले.

ह्या पूर्वजांनी मध्य व दक्षिण आशियामध्ये वास्तव्य केले. सुरुवातीच्या काळात इथे राहणारे पूर्वज हे शिकार करून पोट भरायचे. प्रचंड केसाळ हत्ती (Wooly Mammoth) व अश्या अनेक मोठ्या प्रजातींच्या शिकार करण्यात ह्या पूर्वजांचा सहभाग होता. येणाऱ्या काळात हा आशियाचा भाग व्यापाराच्या व नवीन स्थलांतराच्या जाळ्याचा एक महत्त्वाचा भाग बनला.

वडिलांकडील बाजू –

१) जगातील सर्व पुरुषांचे मूळ हे अंदाजे १४०,००० वर्षांपूर्वी आफ्रिकेत राहणाऱ्या आद्य पुरुषात शोधता येते. ह्या पुरुषाला जननशास्त्रीय आदम म्हणता येईल. (Y- Chromosome dam)
२) अंदाजे ७०,००० वर्षांपूर्वी वडिलांकडील पूर्वजांचे आफ्रिकेतून बाहेर स्थलांतर सुरू झाले
३) अंदाजे ५०,००० वर्षांपूर्वी स्थलांतरितांचा एक भाग मध्य–पूर्व आशियामध्ये पोचला
४) अंदाजे ३०,००० वर्षांपूर्वी एक भाग दक्षिण आशियाकडे वळला
५) अंदाजे २५,००० वर्षांपूर्वी वडिलांकडील पूर्वज दक्षिण आशियामध्ये वसले.

माझे वडिलांच्या बाजूचे पूर्वज हे दक्षिण आशियात व मुख्यत्वाने भारतीय उपखंडात वास्तव्याला आलेल्या सर्वांत जुन्या समूहाचा भाग होते. माझ्या जननशास्त्रीय नातलगांमध्ये नेपाळच्या थरु म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातीचा समावेश होतो, जे मर्यादित प्रमाणात शेती व वनक्षेत्रातील संसाधनावर गुजराण करतात. रोमानी लोकही माझ्या जननशास्त्रीय नातलगांमध्ये समाविष्ट आहेत व त्यांच्याशी माझे पूर्वज बोलीभाषेच्या परंपरेनेही जोडले गेले होते. माझ्या डीएनए अभ्यासावरून माझ्यातील गुणधर्म खालीलप्रमाणे मांडता येतात–

५६% नैर्ऋत्य आशियाचे गुणधर्म,
२६% आग्नेय आशियाचे गुणधर्म,
१२% भूमध्य भागाचे गुणधर्म,
६% उत्तर युरोपचे गुणधर्म

माझ्या जननशास्त्रीय अभ्यासातून आणखी एक विस्मयकारक माहिती मिळते. ती म्हणजे माझ्यामध्ये निएन्दरथल (Neanderthal) व देनिसोवान (Denisovan) या आता नष्ट झालेल्या प्रजातीचेही अंश आहे. आज जरी ह्या प्रजाती अस्तित्वात नसल्या, तरीही ६०,००० वर्षांपूर्वी जेव्हा मनुष्यप्राणी आफ्रिकेतून बाहेर पडला तेव्हा मनुष्यसदृश अशा अनेक प्रजाती युरोप–आशिया खंडांमध्ये वास्तव्याला होत्या. माणसांनी त्यांची केलेली कत्तल, माणसांचे अधिक संख्याबळ व माणसांमुळे वाढलेली शिकारीची स्पर्धा ही ह्या प्रजातीच्या नष्ट होण्याची कारणे मानली जातात. माझ्या जननशास्त्रीय अभ्यासातून असेही पुढे येते की माझ्यामध्ये अंदाजे ३.४% निएन्दरथल व ४% देनिसोवान गुणधर्म आहेत. सर्वसाधारणपणे माणसांमध्ये १% ते ४% निएन्दरथल अंश आढळून येतो. याचा अर्थ आपण या प्रजातींबरोबर कायम लढत होतो किंवा प्रतिस्पर्धा करीत होतो असा नसून, ह्या दोन प्रजातींचे काही धीट लोक दुसऱ्या प्रजातींमधल्या जोडीदाराच्या प्रेमात पडून आपले वंश वाढवीत होते, असे आहे. आपल्या सगळ्यांमध्ये ह्या प्रजांतीचा अंश सापडतो. त्याअर्थाने त्या प्रजाती अद्याप पूर्णपणे नष्ट झालेल्याच नाहीत. त्या आपल्या डीएनएमध्ये अजूनही जिवंत आहेत.

अगदी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत, लोकांचा वर्णभेद व वर्णवर्चस्वाच्या संकल्पनांवर विश्वास होता. डीएनएच्या अभ्यासातून मात्र ह्या समजुतीतील फोलपणा लक्षात येण्यास हरकत नसावी. तसेच जननशास्त्रीय चाचणीत वेगवेगळ्या धर्माच्या लोकांमध्येदेखील काही फरक आढळून येत नाही. हेही माणसाच्या जितक्या लवकर लक्षात येईल तितके चांगले. मानवजात ही हजारो वर्षांच्या, अनेक खंडांना पालथे घालून केलेल्या प्रवासातून व धैर्याने व चिकाटीने

अनेक संकटांचा सामना करून आज इथे पोचली आहे. आपण पृथ्वीवरच्या अत्यंत दुर्गम भागातही आपले घर वसविले आहे. आजही माणसाच्या प्रवासाचा अंत आला आहे? येणारा काळ माणसाला ुठे घेऊन जाईल? ह्या प्रश्नांचे उत्तर अत्यंत कठीण आहे. येणारा काळच ते देऊ शकेल.

भौतिकशास्त्रज्ञ कार्ल सगान ह्यांनी एकदा असे म्हटले होते की – 'जर माणसाने स्वतःचा नाश ओढवून घेतला नाही तर एक दिवस आपण ब्रह्मांडातल्या दुसऱ्या ताऱ्यांकडे आगेकूच करू'. हा अत्यंत भाबडा आशावाद असला तरीही मनाला तर वाटते की असे खरेच घडावे. कोण जाणे एक दिवस कदाचित आपले भावी वंशज माणसाच्या दुसऱ्या ताऱ्यांवरील प्रवासाबद्दल वाचतील!

*सी ४०४, पॅरामाउंट मधुबन सोसायटी,*
*साईनगर, लेन नं. १, खंडोबा मंदिराजवळकात्रज–कोंढवा रोड, पुणे*

■■

# मराठी भाषेचे भवितव्य

*अशोक केळकर*

हल्ली आम्ही इंग्रजी शिकलेले लोक मराठी म्हणून जी भाषा बोलतो व लिहितो ती अशिक्षित बहुजन समाजास – विशेषत: खेड्यात राहणाऱ्यांस कळत नाही. ह्याचे कारण, आमचे शब्द जरी मराठी असतात तरी विचार इंग्रजी व अबालबोध असतात. 'अबालबोध' हा अवघड शब्द मी येथे मुद्दाम वरील दुबळेपणाच्या उदाहरणार्थच योजला आहे. खरी मराठी भाषा ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत होती. ती प्रथम मोरोपंताने बिघडवली. बिघडता बिघडता लोकहितवादी आणि ज्योतिबा फुले ह्यांच्यापर्यंत ती कशीबशी जीव धरून होती, पण चिपळूणकर आगरकरांनी तर तिचा गळाच चेपला. टिळकांनी व हरिभाऊआपट्यांनी तिच्या तोंडात शेवटचे दोन घोट सोडले, पण ते शेवटचेच ठरले. आजकाल चिपळूणकरांचा इंग्रजी–संस्कृत कित्ताच आम्ही सर्वजण अधाशासारखे मिरवत आहोत.

मराठी भाषेवर दुसऱ्या भाषेचा वरचष्मा एवढ्यापुरता हा प्रश्न मर्यादित नाही. तेराव्या शतकात ज्ञानेश्वर आणि महानुभावपंथ ह्यांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाविरुद्ध, सोळाव्या शतकात एकनाथांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाविरुद्ध, सतराव्या शतकात शिवाजीच्या प्रेरणेने बनवलेल्या 'राजव्यवहारकोषा'च्या निमित्ताने फार्सी भाषेतून आलेल्या शब्दांविरुद्ध आणि विसाव्या शतकात राजवाडे, सावरकर, माधवराव पटवर्धन यांनी इंग्लिश व फार्सी भाषांमधून आलेल्या शब्दांविरुद्ध भूमिका घेतल्या आणि त्या त्या काळी त्यांचा काही प्रभावही दिसून आला, पण हा केवळ भाषिक अस्मितेचा प्रश्न नाही. भाषा बालबोध आहे किंवा 'अबालबोध' आहे ह्याचा हा मुख्यत: प्रश्न आहे. आता ज्या दोन प्रवृत्तींचा उल्लेख केला त्यांचे वर्णन धट्टीकट्टी गरिबी आणि लुळीपांगळी श्रीमंती असे आपल्याला करता येईल. जर द.ग. गोडसे यांच्या 'पोत' (मुंबई १९६३) या पुस्तकामधली यादव काळाबद्दलची मीमांसा बरोबर असली तर यादवकालीन पंडिती गद्य आणि 'ज्ञानेश्वरी' हे लुळ्यापांगळ्या श्रीमंतीचे सुरुवातीचे प्रतिनिधी ठरतात. महानुभाव गद्य, एकनाथ, तुकाराम, रामदास, बखरगद्य, लोकहितवादी, फुले, 'बालबोध' मासिक, 'यमुनापर्यटन' कादंबरी, टिळक–आपटे–केशवसुतांची 'खडबडीत' शब्दकळा ही धट्ट्याकट्ट्या गरिबीची साखळी ठरावी. 'ज्ञानेश्वरी'नंतर वामन, मोरोपंत, 'मोचनगड' आणि 'मुक्तमाला' कादंबऱ्या, चिपळूणकर, गडकरी, तांबे, रविकिरण–मंडळ अशी लुळ्यापांगळ्या श्रीमंतीची साखळी ठरावी. धट्टीकट्टी गरिबी असे जिला मी नाव दिले तिचे दोन विशेष सांगता येतील. एक म्हणजे भाषेचा थेटपणा आणि जोरकसपणा. आडवळण, शब्दांची उधळण व नाजूकपणा न मानवणे. दुसरा विशेष म्हणजे आशयाचा साधेपणा आणि एकरंगीपणा. पर्यायाने गुंतागुंत, बहुपदरीपणा न मानवणे. लुळीपांगळी श्रींमती असे जिला मी नाव दिले तिचे दोन विशेष सांगता येतील. एक म्हणजे शब्दभंडार मोठे आणि त्याचा सढळ वापर करणे, पण नेमकेपणा व थेटपणा हरवणे.

दुसरा म्हणजे आशयात चमत्कृती. परस्परविरोधी गोष्टी एकत्र आणण्याचा हव्यास, बहुरंगीपणा. आज मराठीभाषेचे लेखक–वक्ते आणि वाचक–श्रोते यांच्यासमोर दोन पर्याय आहेत. एक म्हणजे प्रवाहपतित राहणे आणि याची परिणती म्हणजे लुळीपांगळी गरिबी पत्करणे. दुसरा म्हणजे डोळसपणाने धट्टयाकट्टया श्रीमंतीसाठी धडपडणे आणि मेहनत घेणे. मराठी भाषेचा अवघा संसार धट्ट्याकट्ट्या श्रीमंतीचा झाला तर प्रकृतिभेदानुरूप जो तो आपली शैली निवडू शकेल आणि ती परिणामकारक करू शकेल. पहिले संभाव्य भविष्य आहे आणि दुसरे कष्टसाध्य भवितव्य आहे.

भाषेचे दारिद्र्य हे अखेर ती भाषा बोलणाऱ्यांचे सांस्कृतिक दारिद्र्य असते. इंग्लिश भाषा मराठी भाषेपेक्षा प्रगल्भ आहे, याचा खरा अर्थ इंग्लिशभाषी मराठीभाषीयांपेक्षा या बाबतीत प्रगल्भ झालेले आहेत. असे होण्याचे कारण त्यांच्या पूर्वजांची चार शतकांची तपश्चर्या त्यांच्या कामी येत आहे हे आहे. नाण्याची दुसरी बाजू म्हणजे मराठीभाषी या बाबतीत अजून पुरेसे प्रगल्भ नाहीत, कारण त्यांच्या पूर्वजांनी सहा–सात शतके मराठीमधून प्रगल्भ विचार स्वत:च्या हिमतीवर करणे सोडूनच दिले होते. त्यांच्यापैकी जे जात्या प्रगल्भ होते त्यांनी संस्कृतचे दुभाषेपण पत्करण्यातच संतोष मानला.

*('वैखरी : भाषा आणि भाषा–व्यवहार' वरून साभार)*

■■

## पत्रसंवाद – १

*अरुण फाळके*

सप्टेंबर २०१४ च्या 'आजचा सुधारक' मधील श्री दिवाकर मोहनी ह्यांचा 'धर्म, धर्मनिरपेक्षता आणि त्यामधून उद्भवणारे काही प्रश्न' हा लेख वाचला.

*मला वाटते लेखाचे शीर्षक अयोग्य आहे. लेखकाला फक्त हिंदुधर्माविषयीच लिहायचे आहे आणि हिंदूंमधला मोठा धर्माभिमानी गट आहे त्याच्या धर्मनिरपेक्षतेविषयी लिहायचे आहे. म्हणून लेखाचे शीर्षक 'हिंदुधर्म, धर्मनिरपेक्षता .... प्रश्न' असे असायला हवे.*

मी हिंदू म्हणून जन्मलो. पण त्यात अभिमान वाटण्यासारखे काहीच नाही (कुणाच्या पोटी जन्मायचे हे आपल्या हातात नसते) मला भारतीय उज्ज्वल (?) परंपरेचा अभिमान वाटत नाही. मी कोठल्याही देवळात जात नाही, कोठल्याही देवाचे स्तवन करीत नाही, कोठलाही सण पाळत नाही, कोठलाही देव मानत नाही (यात अल्ला आणि आकाशातला बाप हेही आले) असे असूनही मी हिंदूच आहे. आणि यात लाज वाटण्यासारखेही काही नाही.

महाराष्ट्रातील तथाकथित पुरोगाम्यांना ते हिंदू आहेत याची लाज वाटते. (त्यांनी अजूनही या नको असणाऱ्या धर्माचा त्याग कसा केला नाही याचे आश्चर्य वाटते.) हिंदू धर्माला नावे ठेवण्याची एकही संधी ते सोडत नाहीत.

सध्याच्या भारतात हिंदू समजले जाणारे लोक अजून तरी बहुसंख्य आहेत हे पुरोगाम्यांना मान्य असावे. आणि संख्येच्या जोरावर काही लोकांना भारत हिंदुराष्ट्र व्हावे असे वाटते – जसे मुसलमानांना भारत इस्लाम व्हावे असे वाटते. हिंदू हे सर्वसाधारणपणे भ्याड आहेत. ते जेथे अल्पसंख्य आहेत तेथे ते कसे गप्प असतात हे पहावे. प्रतिकार करण्याची क्षमता आमच्यात नसल्यामुळे आम्ही आमच्या दुबळेपणाला योग्य असे तत्त्वज्ञान तयार केले, ते म्हणजे अहिंसा.

स्वातंत्र्याआधी व नंतर जेवढ्या धार्मिक दंगली झाल्या त्या सर्व इतर धर्मीयांनी (प्रामुख्याने मुसलमानांनी) सुरू केल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे. आधी भरपूर मार खाल्ल्यावर हिंदूंनी प्रतिक्रिया म्हणून जशासतसे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पण स्वत: होऊ न दंगल सुरू केली नाही. हिंदूंनी कधी आक्रमण केल्याचे मला माहीत नाही. (मुसलमानांनी मात्र सातत्याने आक्रमणे केली आणि अजूनही ते शांत झालेले नाहीत.) ही ऐतिहासिक वस्तुस्थिती जर

मान्य असेल तर मोठाले लेख लिहून धर्मनिरपेक्षता हिंदूंना शिकवण्याची आवश्यकता वाटत नाही. (ज्यूधर्मीयांचा छळ सर्व युरोपियन देशांनी केला पण भारतात ज्यूधर्मीय सुखाने पिढ्यानपिढ्या जगत आहेत.)

पुरोगामी लोकांनी मुसलमानांची धर्मांधता व त्याचे समाजावर होणारे परिणाम याविषयी परखड लेख लिहून मुसलमानसमाजाचे प्रबोधन करावे अशी माझी विनंती आहे. मुसलमान अतिरेक्यांनी केलेल्या (भ्याड?) हल्ल्यांबाबत कोणी मुसलमान नेत्याने, धर्ममार्तंडाने, मुल्ल्याने, मौलवीने जाहीर निषेध केल्याचे माझ्या पाहण्यात नाही. सामान्य नागरिकास (तो कोठल्याही धर्माचा असो) शांतपणे जगायला आवडते त्याला मिळणारे उत्पन्न व्यवस्थित चालू रहावे, त्याच्या बायकामुलांना सुस्थितीत जगता यावे, एवढीच त्याची अपेक्षा असते. पण जेव्हा मुस्लिम मौलवी किंवा धर्ममार्तंड 'इस्लाम खतरे में है' अशी आवई उठवतात तेव्हा याच सामान्य मुसलमान नागरिकांपैकी अनेकजण त्याला प्रतिसाद देतात आणि त्याचे परिणाम काय होतात हे आपल्याला माहीत आहे.

हिंदूंचे धर्ममार्तंड निष्क्रिय आहेत – शतकानुशतके ते तसेच आहेत. या लोकांना समाजप्रबोधन करून आपल्याच समाजातला एक मोठा भाग आपण बहिष्कृत करू नये, तोही सर्वांच्या सारखा माणूसच आहे आणि जे इतरांना मिळते ते त्यालाही मिळायलाच हवे असे कधीही सांगितले नाही किंवा तसे घडण्यासाठी कोठलाही प्रयत्न केला नाही ही शरमेची बाब आहे. आज शंकराचार्य साईबाबा देव नाहीत या विषयी जाहीर बोलतात, याहून महत्त्वाचे प्रश्न हिंदू समाजापुढे आहेत असे त्यांना वाटतच नसावे.

शेवटी पुन्हा एकदा समस्त बुद्धिमान पुरोगामी लोकांना विनंती करतो की त्यांनी मुस्लिम समाजाला भारतात शांतता प्रस्थापित करून टिकवण्यासाठी त्यांनी काय काय करावे याविषयी तपशीलवार लिहावे.

*३, रांका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२*

■■

## पत्रसंवाद – २

*सुभाष आठले*

१) प्रथम संपादकांचे आभार – कारण त्यांनी 'या विषयावरील संवाद आता बंद करण्यात आला आहे' असा निर्णय घेतला नाही.

२) माझ्या व राजीव जोशी यांच्या आक्षेपांना सविस्तर उत्तर दिल्याबद्दल तारक काटे यांचेही आभार मानतो.

३) **पारंपारिक शेतीची उत्पादकता** – ब्रिटिश अंमल सुरू झाल्याने काही गोष्टी सुरू झाल्या.

(अ) (रेकॉर्ड कीपिंग) विविध नोंदी करणे. त्यामुळे त्यानंतरच्या दुष्काळ, गरिबी, संपन्नता, शेतीची उत्पादनक्षमता यांची विश्वासार्ह माहिती उपलब्ध आहे. तशी विश्वासार्ह माहिती त्यापूर्वीची नाही. सांगोवांगीची, परदेशी प्रवाशांनी लिहिलेली अशी त्रोटक माहिती आहे. त्यामुळे १७६२ ते १७६५ या काळातील २५६०० शेतकरी कुटुंबातील १५१८२१ हेक्टरमधील धान उत्पादनाचे आकडे कोणीही दिले असले तरी–थोडे संशयीपणानेच स्वीकारावे.

(ब) सार्वजनिक आरोग्यव्यवस्था आणि शास्त्रीय वैद्यक. त्यापूर्वीच्या काळात प्रत्येक जोडप्याला ८–१० मुले झाली तरी १–२ मुलेच जगत. त्यामुळे लोकसंख्या कमी होती, जमिनीच्या तुलनेत त्यावर जगणारी लोकसंख्या कमी होती. साहजिकच सरासरी आयुर्मयादा २० ते २३ वर्षे होती. तरीही काही काटक माणसे १०० वर्षे जगत हे खरे आहे, पण ६० वर्षे जगणे दुर्मिळ होते, तसे झाल्यास एकसष्ठीचा समारंभ केला जात असे. आज माणूस साठ वर्षे जगणे हाच नियम झाला आहे. साधारण १९०० सालानंतर खरी लोकसंख्यावाढ सुरू झाली. स्वातंत्र्य मिळताना शेती खऱ्या अर्थाने पारंपारिकच होती. सिंचनखते, चांगले बियाणे, कीटकनाशके या गोष्टी जवळपास नव्हत्या. त्या पारंपारिक शेतीला

त्यावेळच्या ३० कोटी लोकसंख्येला अन्न  पुरवण्यात अपयश आले आणि पी.एल. ४८० खाली बोटी भरून धान्य (आणि नंतर दुधाची भुकटी) आयात करून दुष्काळ टाळावा लागला. नंतर आधुनिक बियाणी, खते, जंतुनाशके, सिंचन यांच्या वापरामुळे उत्पादन वाढले. व आज आपण १२० कोटी जनतेला पुरेसे धान्य पुरवून भरपूर निर्यात करत आहो. तेव्हा पारंपारिक शेतीच्या क्षमतेचे गोडवे फक्त तारक काटे यांनीच गावे.

या आधुनिक शेतीच्या तंत्रामुळे काही नुकसानही झाले, होत आहे. पण त्यावर पुन्हा शास्त्रीय संशोधनाचे उपाय करावे लागतात. ते नुकसान टाळण्यासाठी पुन्हा पारंपारिक शेतीकडे वळणे शक्य आणि इष्ट नाही – लोकसंख्या पुन्हा १०–१२  कोटीपर्यंत कमी झाली तरच ते शक्य होईल !

**४) शेतकरी बाजारी व्यवस्थेचे बटीक बनणे** – शेतकऱ्याला त्याचे उत्पादन बाजारात विकावेच लागते. फक्त स्वत:पुरते पिकवून जगता येत नाही. बाजारी व्यवस्था ही फार पुरातन आहे आणि तिचे राक्षसीकरण करणे, तिला काही मूलभूत दुर्गुण चिकटवणे चुकीचे आहे. शेतकऱ्याला शेतीसाठी आणि स्वत:च्या कुटुंबासाठी लागणाऱ्या वस्तू सेवा विकत घेण्यासाठी आपले उत्पादन बाजारात विकून पैसा मिळवलाच पाहिजे. फक्त (बार्टर) वस्तु सेवा यांच्या पैसा–विरहित विनिमयाने भागणार नाही. बाजारात नियमबद्धता, करारपालन, पारदर्शकता, विश्वासार्हता असावी आणि मक्तेदारी असू नये याची दक्षता शासनाने योग्य कायदे व आवश्यक संस्था निर्माण करून घ्यावयाची असते. मगच त्याला 'बाजार–व्यवस्था' म्हणता येईल. नाहीतर 'बाजार–अव्यवस्था' म्हणावे लागेल. नवीन संशोधन–दर्ज्याची खात्री, विक्री–नंतरचे साहाय्य यांच्या जोरावर काही कंपन्या मक्तेदारी सदृश विक्री–प्रमाण निर्माण करतात, पण ती खरी मक्तेदारी नव्हे. किंमत आणि दर्जा यांच्या जोरावर इतर कंपन्या स्पर्धा करून वरचढ जागा मिळवू शकतात व या स्पर्धेमुळे ग्राहकांना दर्जा आणि किंमत दोन्ही बार्बीमध्ये फायदा होतो. स्पर्धेमुळेच शेतकऱ्यांना अधिक चांगली बियाणी, खते, पंप, ट्रॅक्टर, जंतुनाशके वगैरे मिळतात. पण डाव्या मनोवृत्तीच्या शासनाकडून आणि एन.जी.ओ. कडून या स्पर्धेला म्हणजे बाजारालाच विरोध होतो. 'व्यवस्थित' बाजार हा सर्वांच्याच फायद्याचा असतो.

**५) उत्क्रांतिशास्त्र आणि जनुकीय बदल**

उत्क्रांतिशास्त्राप्रमाणे कोणतेही जनुकीय बदल दर पिढीला साठत जातात हे खरे नाही. फक्त त्या जिवाच्या जगणे–तगणे–पुनक्षरुत्पादन करणे याबाबतीत फायदेशीर असणारे जनुकीय बदलच त्या प्रजातीमध्ये टिकून राहतात. त्या प्रजातीमधील अधिक–अधिक टक्के जीवांमध्ये ते जनुकीय बदल दिसू लागतात पण त्या जीवाच्या प्रत्येक पेशीमधील जनुकीय रचनेत त्या बदलाचे प्रमाण वाढत नाही. तेवढेच राहते. फक्त त्याबदलाचे एक जनुक आहे का दोन आहेत एवढाच फरक पडतो.

**६) जनुकीय बदल अपरिवर्तनीय?**

जर जुनकीय बदल प्रत्येक पिढीमध्ये तसेच राहत असते, तर शेतकऱ्याला रु. १७०० किलोप्रमाणे बीटी बियाणे नवीन लागवडीसाठी घ्यावे लागले नसते. मग महाग बियाण्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागते. मॉन्सॅटोवर अवलंबून राहून परावलंबी  व्हावे लागते, ही विधाने खोटीच म्हणावी लागतील. तसे असेल तर मॉन्सॅटोला धंदाच राहणार नाही. विदर्भात बीटी–विरहित बियाणी मिळत नसतील, तर त्याचा अर्थ त्याला गिऱ्हाइकच उरले नाही साधे बियाणे विकत घेण्यास एकही शेतकरी तयार नाही. मग कोणता विक्रेता ते आपल्या दुकानात ठेवेल? ७) कॅन्सर आणि जनुकबदल (ज.ब.) मका

सेरालिनी यांचा ज.ब. मका /किंवा राउंड अप यामुळे उंदरांमधील कॅन्सरच्या प्रमाणात वाढ होते असा शोधनिबंध प्रथम 'फूड ॲन्ड केमिकल टॉक्सिकॉलॉजी' (फू.के.टॉ.) या नामांकित जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला. या निबंधाच्या प्रसिद्धिपूर्व प्रचारासाठी सेरालिनी यांनी पत्रकारपरिषद घेतली. या पत्रकारपरिषदेत प्रवेश देण्यासाठी पत्रकारांकडून एक करारनामा लिहून घेतला. की ते पत्रकार या शोधनिबंधावर इतर शास्त्रज्ञांची मते विचारणार नाहीत. (संदर्भ  १७८) संदर्भ १७५, १७६, १७७.

हा लेख प्रसिद्ध झाल्यावर तो शोधनिबंध योग्य नाही असे प्रतिपादणारी अनेक पत्र फू.के.टॉ.कडे आले. त्यांचे म्हणणे असे होते की या उंदरांमध्ये निसर्गत:च कॅन्सर होण्याचे प्रमाण जास्त म्हणजे नरांमध्ये ७१% तर माद्यांमध्ये ८१% होते. त्यामुळे ही उंदरांची जात ज.ब.मक्यामुळे कॅन्सर होतो का हे पाहण्यासाठी योग्य नव्हती. तसेच या प्रयोगासाठी वापरलेली प्रत्येक गटातील उंदरांची संख्या संख्याशास्त्रीय निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने अपुरी होती. प्रत्येक गटात किमान ५० उंदीर नर आणि ५० मादी उंदीर आवश्यक होते. त्याऐवजी प्रत्येक गटात फक्त १० मादी आणि १० नर उंदीर होते. वगेरे (१७९, १८०, १८१, १८२, १८३ ते २००) या शोधनिबंधाच्या विरुद्ध जशी पत्रे आली तशीच बाजूने ही पत्रे आली. फू.के.टॉ. ने ही सर्व पत्रे आणि सेरालिनी यांनी त्यावर दिलेले उत्तर हे सर्व प्रसिद्ध केले आणि नंतर जानेवारी २००१, तेश्र. ६३, झस. २४४ वर सेरालिनी यांचा मूळ शोधनिबंध (डेपस ढशीा ढेळलळीूेष ठेीपव णि क्शीलळललळवश रपव ॠच चरळश फू.के.टॉ. तेश्र. ५०, र्खीीश खख, छेींशालशी २०१२, झरसश ४२२१-४२३१) परत घेतल्याचे जाहीर केले. (ठशीीरलींशव) परत घेण्याचे कारण 'शोधनिबंधात दिलेल्या निरीक्षणांवरून (ऊरींर) दिलेला निष्कर्ष काढता येत नाही' असे दिले. सेरालिनी यांच्यावर खोटेपणाचा किंवा अप्रामाणिकपणाचा आरोप केला नाही.

वरील सर्व घटना पाहता फू.के.टॉ.वर पक्षपातीपणाचा किंवा मॉन्सॅटोकडून पैसे घेऊन सेरालिनी यांच्यावर अन्याय केल्याचा आरोप करता येत नाही. त्यामुळे मी.फू.के.टॉ.वर जास्त विश्वास ठेवून, जबामक्यामुळे उंदरांमध्ये कॅन्सर वाढतो याला पुरावा नाही, या निर्णयावर आलो. वाचकांनी फू.के.टॉ. वर विश्वास ठेवायचा, का सेरालिनी आणि तारक काटे यांच्यावर ठेवायचा याचा निर्णय आपापला घ्यावा.

## सेरालिनी यांचे इतर शोध-निबंध

२००७, २००९ आणि २०११ मध्ये सेरालिनी यांनी मॉन्सॅटोने केलेल्या 'उंदरांना च-८६३, च-८१० आणि छ्घ-६०३ या तीन प्रकारचा जबमका खायला देण्याच्या प्रयोगांमधील निरीक्षणाची फेरतपासणी केली. त्याने असा निष्कर्ष काढला की जबमक्यामुळे उंदरांची लिव्हर, किडनी आणि हृदय यांचे नुकसान झाले. युरोपियन फूड सेफ्टी ॲथॉरिटीने (EFSA) तीच निरीक्षणे तपासून असा निष्कर्ष काढला की जो काही थोडा परिणाम दिसला तो नैसर्गिकपणे कंट्रोल उंदरांमध्ये दिसणाऱ्या प्रमाणात बसण्यासारखा होता. एऋझ्अ ने असेही नमूद केले की सेरालिनीने वापरलेल्या संख्याशास्त्रीय पद्धती चुकीच्या होत्या. एऋझ्अ च्या निष्कर्षांना फ्रेंच हाय कौन्सिल ऑफ बायोटेक्नॉलॉजीज सायंटिफिक कमिटीने दुजोरा दिला. संदर्भ १६३ ते १७४.

आरपड पुढझाई यांनी १९९८ साली उंदरांना जबबटाटा खाण्यास दिल्यावर उंदरांची वाढ खुंटते आणि त्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. अशी मुलाखत ग्रॅनाडा टेलिव्हिजनवर दिली. रॉवेट इन्स्टिट्यूट आणि रॉयल सोयायटी यांनी पुटझाई यांच्या अभ्यासाची फेरतपासणी केली. आणि त्यातील निरीक्षणांवरुन पुढझाई यांनी काढलेले निष्कर्ष निघतच नाहीत असे मांडले. संदर्भ १४७ ते १५७ बहुमान्य शास्त्रीय सहमत वरीलप्रमाणे उंदरांमध्ये ज.ब. अन्नाचे दुष्परिणाम दाखवणारे सर्व शोधनिबंध हे शास्त्रीय काटेकोर निकषांवर हिणकस ठरले आहेत. तरीही ग्रीन पीस, ऑरगॅनिक कन्झ्युमर्स असोसिएशन, सेंटर फॉर फूड सेफ्टी यांसारख्या संस्था आणि वंदना शिवा, तारक काटे यांच्यासारख्या व्यक्ती याच अशक्त आणि हिणकस शोधनिबंधाचा दाखला देत ज.ब. पिकांबद्दल भीति पसरवत आहे. त्यामुळे सामान्य वाचक गोंधळात पडून त्यांची दिशाभूल होण्याची शक्यता आहे. सर्व संदर्भ तपासून पाहणे व त्यांना तौलनिक महत्त्व देणे सामान्य वाचकाच्या आवाक्यात नाही. मग त्याने काय करावे? तर बहुमान्य शास्त्रीय सहमती (ब्रॉड सायंटिफिक कन्सेससचा) आधार घ्यावा. या सहमतीनुसार जब अन्न हे साध्या अन्नापेक्षा जास्त नुकसानकारक नाही. (संदर्भ १, २, ३, ४, ७१, ७२, ७३) माणसावर जब अन्नाचा दुष्परिणाम दाखवणारा एकही दस्तऐवज नाही. (संदर्भ ४,५,६) १९१२ मध्ये अमेरिकन असोसिएशन फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्सेस ने लिहिले की जबअन्न हे साध्या अन्नापेक्षा माणसाला जास्त धोकादायक नाही. (संदर्भ १) अमेरिकन मेडिकल असोसिएशन, नॅशनल अकॅडेमी ऑफ सायन्सेस आणि रॉयल सोसायटी ऑफ मेडिसीन या मान्यवर संस्थांनी लिहिले की 'गेल्या २५ वर्षांत १३०

रिसर्च प्रोजेक्टस आणि ५०० स्वतंत्र रिसर्च ग्रुप्स, यांच्या संशोधनातून असे सिद्ध होते की जबपिके ही माणसाला इतर सर्वसामान्य पिकांपेक्षा जास्त धोकादायक नाही. (संदर्भ २)

२००२ ते २०१२ पर्यंत ज.ब. अन्न आणि पिके यांविषयी प्रसिद्ध झालेल्या १७८३ शोधनिबंधांचा अभ्यास करून एक २०१३ साली निबंध–अभ्यास प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार जब अन्नामुळे व पिकांमुळे माणूस आणि इतर प्राणी यांचे नुकसान होत असल्याचा कोणताही सबळ पुरावार मिळत नाही. (संदर्भ २)

याविरुद्ध काम करत असलेल्या ग्रीन पीस, वर्ल्ड वाइड ब्लाइफ फंड ऑरगॅनिक कन्झ्युमर्स असोसिएशन सेंटर फॉर फूड सेफ्टी, या चळवळ्या संस्थांची (ॲडव्होकसी ग्रुप्स) भूमिका (१) जब पिकांपासून आरोग्य आणि पर्यावरण यांच्या होऊ शकणाऱ्या संभाव्य नुकसानीची त्यांना काळजी वाटते. (२)या संभाव्य नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी सध्या वापरण्यात येणारे तंत्रज्ञान आणि मानदंड अपुरे आहेत. त्यांत सुधारणा व्हायला हवी अशी आहे. या भूमिकांशी सर्वांना सहमत व्हायला हरकत नाही. पण या संस्थांनी असे स्पष्टपणे मांडायला हवे की आजतागायत असा सबळ पुरावा मिळालेला नाही. निष्कारण भीति पसरवू नये.

### ॲलर्जीविषयी

अमेरिकेत पूर्वी किवी या फळाबद्दल ॲलर्जी नव्हती. पण या फळाचा अमेरिकेत प्रसार झाल्यावर आता ॲलर्जी दिसू लागली म्हणून सर्व अमेरिकेत किवी फळाला बंदी घालायची काय? तीच गोष्ट ज.ब. पिकांबद्दल आहे.

### हॉरिझाँटल जीन ट्रॅन्स्फर

ब्राझीलमधील रानटी मक्यामध्ये असे जीन संक्रमण झाल्याचे आढळले. पण काही वर्षांनी पुन्हा तपासणी केल्यावर रानटी मक्यातून ते जीन नष्ट झाल्याचेही आढळले. तसेच राउंड अप विरोधी गुणदेखील काही तणांमध्ये सापडले. पण त्या तणांच्या पुढच्या पिढ्यांमध्ये हे गुण सापडले नाहीत.

तरीही याविषयी अभ्यास चालू राहीलच.

आ.सु.मधील लेखात या सर्व प्रश्नांचा सविस्तर गोषवारा घेणे कठीण आहे. पण जिज्ञासू वाचकांना विकीपीडीयावर या स्थळाला भेट दिल्यास सर्व सविस्तर माहिती व संदर्भ मिळू शकतील. ॲलर्जी, हॉरिझॉन्टल ट्रॅन्स्फर, जैव विविधतेला धोका या व इतर अनेक विषयांवर त्यामध्ये माहिती मिळू शकेल.

### बियाणे निवडीचे स्वातंत्र्य

काटे म्हणतात की ‘सध्या बाजाराला हवे असेल तेच शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न होतोय’ बाजाराला म्हणजे कोणाला? शेतकरी सोडून बियाण्याला अन्य गिऱ्हाईक कोणते? म्हणजे ‘शेतकऱ्यांना हवे असेल तेच बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न होतोय’ असे विधान होते. हे विधान निरर्थक नाही का? शेतकऱ्यांवर ज.ब.बियाणे घेण्याची सक्ती कोणी करू नये आणि करत नाही आहे. फक्त बीटी कापसाबद्दल खरे आहे. पण इतर जबपिकांबद्दल उदा बीटी वांगे, बीटी सोयाबीन, यांच्याबद्दल मात्र बी.टी.बियाण्यांचे संशोधन, प्रयोग, उत्पादन, विक्री न करण्याची सक्ती सरकार आणि वरील चळवळ्या संस्था करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या माथी या पिकांची साधी बियाणी मारली जाती आहेत, बीटी बियाणी विकत घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना मिळत नाही. याबद्दल शेतकऱ्यांनीच चळवळ करणे आवश्यक आहे. तसे स्वातंत्र्य त्यांनी बीटी कापसाच्या बाबतीत आडमार्गाने मिळवले. बीटी वांगे, सोयाबीन यांच्या बाबतीत शेतकऱ्यांना आडमार्गाने स्वातंत्र्य मिळवावे लागू नये.

### कुपोषण

मी कुपोषणाच्या बाबतीत भारताची तुलना इतर देशांशी करत नाही. पण स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत पोषणाच्या बाबतीत प्रगती झाली आहे. अधोगती नाही, धान्य, कडधान्ये, दूध, अंडी, फळे, भाज्या या सर्वांच्या उत्पादनात वाढच झाली आहे. आणि गरीब वर्गापर्यंत या वस्तू पोचत आहे. गरिबीच्या प्रमाणातही घट झाली आहे.

### कॅन्सर

कोणत्याही वापरातल्या कीटकनाशकामुळे किंवा तणनाशकामुळे कॅन्सर होतो ते सिद्ध झालेले नाही. वयोमर्यादा वाढल्यामुळे भारतातील सर्व प्रांतांत कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. पंजाबमध्ये इतर भारतापेक्षा कॅन्सरचे प्रमाण जास्त आहे अशी आकडेवारी उपलब्ध नाही. कॅन्सर रजिस्ट्री ऑफ इंडियाने तसे प्रसिद्ध केलेले नाही, आरोग्यखात्यानेही नाही. हा सर्व अनाठायी भीति पसरवण्याचा प्रकार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा प्रकार अनेक पैलूंचा आहे. ज.ब. पिकांशी त्याचा संबंध नसल्यातच जमा आहे.

### सेंद्रिय शेती

सेंद्रिय शेती यशस्वी झाली तर मलाही पाहिजेच आहे. फक्त ती शेतकऱ्यांना कशी स्वीकारला लावायची हा गहन प्रश्न आहे. तशी सक्ती करणार का?

### संशयीपणा

माझ्या संशयीपणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजेच मीच चुकत असण्याची शक्यता आहे, याची मी स्वत:ला कायम आठवण करून देत असतो.

*२५, नागाळा पार्क कोल्हापूर, ४१६००३*

■■